
पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई • वर्ष: 7 • अंक: 21 • 1 नोव्हेंबर 2025 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.



प्रत्येक घरी स्वदेशी

घरो-घरी स्वदेशी

# स्वदेशी भारत, आत्मनिर्भर भारत




## अध्यक्षीय मनोगत

# ‘स्वदेशी’ची ताकद

यावर्षीची दिवाळी भारतीयांसाठी अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरली. यंदाच्या दिवाळीला ‘जीएसटी दरकपात’ आणि ‘घर-घर स्वदेशी’ची पार्श्वभूमी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना नवरात्र आणि दिवाळीमध्ये स्वदेशी म्हणजे भारतात बनविलेल्या वस्तू खरेदी करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला भारतीयांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे स्पष्ट झाले आहे. आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर स्वदेशी वस्तूंच्या उत्पादनात आणि विक्रीत वाढ झाली पाहिजे, हे जाणून पंतप्रधानांनी सातत्याने स्वदेशी वस्तूच खरेदी करण्याचे आवाहन देशाच्या नागरिकांना केले आहे. ‘व्होकल फॉर लोकल’ हा मंत्र प्रत्येक भारतीय नागरिकाने प्रत्यक्षात आणला तर आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट लवकरच साध्य होईल. स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीएसटी कर रचनेत मोठे बदल करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार मोदी सरकारने जीएसटी दरकपातीची अंमलबजावणी २२ सप्टेंबरपासून सुरू केली. या दरकपातीमुळे दैनंदिन वापरातील छोट्या-छोट्या वस्तूंपासून दुचाकी, चारचाकीपर्यंतच्या अनेक वस्तूंच्या किमतीत मोठी घट झाली. त्यामुळे यावर्षीच्या दिवाळीत भारतीय नागरिकांनी विक्रमी खरेदी केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही महिन्यांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेची टिंगल केली होती तसेच भारतीय वस्तूंवर मोठे आयात शुल्क लादले होते. या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था किती भक्कम आहे, याचा खणखणीत पुरावा नवरात्र ते दिवाळी या दरम्यान झालेल्या प्रचंड उलाढालीतून मिळाला आहे. दिवाळीत एकाच दिवशी देशभर १ लाख चारचाकींची ग्राहकांना डिलिव्हरी करण्यात आली. नवरात्र आणि दिवाळीत वाहन उद्योग क्षेत्रात नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. भारतीय जनता पार्टीने ‘घर-घर स्वदेशी, हर-घर स्वदेशी’ हे अभियान देशभर चालू केले होते. स्वदेशी वस्तू खरेदी करण्याचे महत्व या अभियानातून नागरिकांना पटवून देण्यात आले. यामुळेच दिवाळीमध्ये भारतीयांनी स्वदेशी वस्तू खरेदी करण्याला प्राधान्य दिले. तमिळनाडूतील शिवकाशी फटाक्यांच्या विक्रीने यंदाच्या दिवाळीत नवा विक्रम प्रस्थापित केला. दिवाळीत ७ हजार कोटी रु.च्या शिवकाशी फटाक्यांची विक्री झाली आहे. गेल्या काही वर्षात चीनमधील फटाक्यांची दिवाळीत मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याचे आढळून आले होते. यावर्षी भारतीयांनी निश्चय करत स्वदेशी फटाक्यांची खरेदी केली. भारतीय अर्थव्यवस्थेची टिंगल करणाऱ्या नवरात्र आणि दिवाळीतील खरेदीमुळे सणसणीत चपराक बसली आहे. यावर्षीच्या दिवाळीत ८७ टक्के ग्राहकांनी भारतीय वस्तूंची खरेदी केली. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी भारतीय वस्तूंच्या विक्रीत २५ टक्के वाढ झाल्याचे व्यापारी संघटनांकडून सांगण्यात आले. मोदी सरकारच्या आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला ‘मेक इन इंडिया’सारख्या उपक्रमाची जोड मिळाली. मोदी सरकारने देशांतर्गत उत्पादन वाढविण्यासाठी विशेष मोहीम (नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग मिशन) घोषित केले आहे. त्याद्वारे देशांतर्गत उत्पादन वाढवणे आणि निर्यात वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ‘मेक इन इंडिया’सारख्या उपक्रमात सातत्य ठेवल्यामुळे देशात सेमीकंडक्टर क्रांती होत आहे. सेमीकंडक्टर चीपसाठी आपल्याला अन्य देशांवर अवलंबून राहावे लागत होते. लवकरच भारतात बनलेली पहिली सेमीकंडक्टर चीप बाजारात येईल. मोदी सरकारच्या आत्मनिर्भर भारताच्या संकल्प सिद्धीविषयी विस्तृत माहिती या अंकात देण्यात आली आहे. कार्यकर्त्यांनी ही माहिती जाणून घेतली पाहिजे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर


विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

स्वदेशी भारत, आत्मनिर्भर भारत ०४

देशभर 7 लाख कोटींची महाविक्रमी उलाढाल ११


दिवाळीत एका दिवसात एका लाखांहून अधिक कारची खरेदी १३


स्वदेशी ‘तेजस’ची झेप १५

पंतप्रधान मोदी यांनी आयएनएस विक्रांतवर साजरी केली दिवाळी १९

सैन्यदलाचे मनोबल वाढविणारे पंतप्रधान २१


हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# स्वदेशी भारत, आत्मनिर्भर भारत

२०२० मध्ये कोरोना संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली होती. भारताला कमीत कमी वस्तू आणि सेवांची आयात करावी लागेल, जास्तीत जास्त वस्तू आणि सेवांची निर्यात व्हावी, नागरिकांनी यासाठी देशात बनलेल्या वस्तू प्राधान्याने खरेदी कराव्यात, अशी या संकल्पने मागची कल्पना होती.



विदेशी उत्पादकांनी भारतात येऊन उत्पादन सुरू करावे, जेणेकरून भारतातील रोजगाराच्या संधी वाढतील, या दृष्टीने मोदी सरकारने धोरणात्मक निर्णय घेतले. याचा परिणाम भारत हा स्मार्ट फोनची निर्यात करणारा जगातील क्रमांक एकचा देश बनला आहे. भारतीय उत्पादकांनी जागतिक स्तरावरील दर्जाचे मापदंड पाळून उत्पादन करावे, अशी अपेक्षा मोदी सरकारने व्यक्त केली होती. त्यासाठी उद्योगपतींना आवश्यक ते सहकार्यही मोदी सरकारने केले. २०२० मध्ये आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली गेल्यानंतर त्यासाठीची आवश्यक पार्श्वभूमी तयार करण्याचे काम मोदी सरकारने केले. २२ सप्टेंबर रोजी जीएसटी दरकपातीनंतर देशभर बचत उत्सवाला प्रारंभ झाला. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर-घर स्वदेशी, घर-घर स्वदेशी, गर्व से कहो ये स्वदेशी है', या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी देशात बनलेल्या वस्तूच नवरात्र आणि दिवाळी उत्सवात खरेदी करा, असे आवाहन केले होते. या आवाहनाला भारतीयांनी प्रचंड प्रतिसाद दिला. आत्मनिर्भर भारताची झलक संपूर्ण जगाने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाहिली आहे.

ब्रह्मोससारख्या क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानच्या अनेक विमानतळांचे, लष्करी तळांचे प्रचंड नुकसान केले. स्व: संरक्षणासाठी शेजारी राष्ट्रांच्या भूमीत घुसून हल्ले करणारा भारत जगाने पूर्वी पाहिला नव्हता.

स्वदेशीच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने भारत निर्धारपूर्वक पावले टाकतो आहे. भारतीयांना परदेशी वस्तू वापरण्याचा प्रचंड अभिमान होता आणि आहे ही. ही परिस्थिती बदलण्यासाठी जागतिक दर्जाची उत्पादने भारतात बनविण्यासाठी उत्पादकांना गेल्या ११ वर्षात प्रोत्साहन दिले गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील आत्मनिर्भर भारत कसा आकार घेत आहे, याचा आढावा या अंकात घेण्यात आला आहे.

सरकार आणि नागरीक एकत्र आले तर 'सबका साथ, सबका विकास'ही घोषणा प्रत्यक्षात येते मात्र त्याबरोबर आत्मनिर्भर भारताचे स्वप्नही साकार होते.

प्रत्येक घरी स्वदेशी • घरो-घरी स्वदेशी •

## कृषी

# स्वयंपूर्णतेसाठी घेतलेले निर्णय

**गेल्या ११ वर्षात अन्नधान्याच्या उत्पादनात भारत स्वयंपूर्ण बनावा यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. त्यामुळे भारताची कृषी आयात मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. उत्पादन, सेवा या क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्रानेही देशाच्या जीडीपीमध्ये मोठा वाटा उचलावा यासाठी मोदी सरकारने पावले टाकली आहेत. कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी घेतलेल्या निर्णयांचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत.**

### अन्नधान्य उत्पादन

2013-14: **246.42** दशलक्ष टन

2024-25: **353.96** दशलक्ष टन



गेल्या ११ वर्षात देशातील दूध उत्पादनात सुमारे ६४ टक्के वाढ झाली आहे. देशातील ८ कोटी शेतकरी दूध उत्पादन व्यवसाय करीत आहेत.

### प्रक्रिया केलेल्या अन्नाची निर्यात वाढली

2014-15: **13.7%**

2024-25: **20.4%**



- खरीप, रब्बी या दोन्ही हंगामातील पिकांच्या किमान हमी भावात (एमएसपी) सातत्याने वाढ करण्यात आली आहे. पीक उत्पादनाचा सर्व खर्च लक्षात घेऊन शेतकऱ्याला ५० टक्के फायदा मिळावा यासाठी मोदी सरकारने निर्णय घेतले आहेत.
- २०१९ पासून 'पंतप्रधान किसान सन्मान निधी' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेद्वारे ऑगस्ट २०२५ पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात ३.९० लाख कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.
- जुलै २०२५ पर्यंत शेती आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाची निर्यात ४९.४ बिलियन डॉलर्स एवढ्या विक्रमी पातळीपर्यंत पोहचली आहे. प्रक्रिया केलेल्या अन्नाची निर्यात २०.४ टक्क्यांनी वाढली आहे.
- भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मस्त्य उत्पादक देश बनला आहे. गेल्या ११ वर्षात देशातील मासे उत्पादनात १०४ टक्के वाढ झाली आहे.
- २०२२-२३ मध्ये देशात १.४२ लाख मे.टन एवढे मध उत्पादन झाले. ८० हजार मे.टन मधाची निर्यात.



**1,37,756** कोटी एवढ्या रकमेची तरतूद शेती क्षेत्रासाठी करण्यात आली आहे.



### मेक इन इंडिया चे यश

'भारत फक्त असेंब्ली करतोय, पार्ट्स तर चीन-तैवानहून येतात' असं म्हणत गेली कित्येक वर्षं मोदींच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाची विरोधक चेष्टा करत आहेत. आता चित्र पालटतंय. मायक्रोमॅक्स ग्रेटर नोएडा येथे दोन नवीन कारखाने उभारत आहे. काम जवळजवळ पूर्ण होत आलं आहे. हे कारखाने चिनी कंपन्यांसाठी सुटे भाग तयार करणार आहेत!! इलेक्ट्रिकल कम्पोनेंट्स आणि इलेक्ट्रॉनिक पार्ट्स भारतातून चीनमध्ये पाठवण्यासाठी असे डजनभर कारखाने यूपी, तमिळनाडू आणि गुजरातमध्ये उभे राहत आहेत, जे सध्या बांधकामाच्या वेगवेगळ्या स्टेजवर आहेत. 'मेड-इन-इंडिया' अंतर्गत बाहेरच्या मोठ्या कंपन्यांना कमी-जास्त प्रमाणात मालपुरवठा करणाऱ्या भारतीय कंपन्यांनी आधी आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या गरजा आणि क्वालिटी-कंट्रोलचे महत्व समजून घेतले. त्यानंतर सरकारच्या इन्सेंटिव्ह योजनांचा लाभ घेत गुंतवणूक उभारली आणि योग्य इनोव्हेशन केली. आज या कंपन्या चीनच्या कम्पोनेंट्स बनवायच्या उद्योगांशीच थेट स्पर्धा करत आहेत आणि त्यात त्यांना यशही मिळत आहे.


प्रत्येक घरी स्वदेशी
घरो-घरी स्वदेशी

संरक्षण

# आयातदार ते निर्यातदार असा अभिमानास्पद प्रवास

**'ऑपरेशन सिंदूर'मुळे जगाला भारताची ताकद कळाली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये स्वदेशी शस्त्रास्त्रांनी आणि उपकरणांनी मोठी कामगिरी बजावली. काही वर्षापूर्वीपर्यंत भारत हा मोठ्या प्रमाणात संरक्षण उत्पादनांची आयात करणारा देश होता. आता भारत संरक्षण उत्पादनांची निर्यात करणारा देश बनला आहे.**


## संरक्षण खात्यासाठीची तरतूद




## देशातील उत्पादन




## संरक्षण उत्पादन निर्यात




- ६५ टक्के संरक्षण उपकरणे आता देशात तयार होत आहेत. काही वर्षांपूर्वी सुमारे ७० टक्के उपकरणे, शस्त्रास्त्रे यांची आयात करावी लागत होती.
- नौदल आणि तटरक्षक दलाच्या ९७ टक्के युद्धनौका आता देशातच तयार होत आहेत.
- उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूतील डिफेन्स कॉरिडॉरद्वारे देशांतर्गत संरक्षण उत्पादनामध्ये वाढ करण्यात आली आहे.
- संरक्षण दलासाठी आवश्यक अशा नव-नव्या शोधांसाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण मोदी सरकारने अंमलात आणले आहे.
- देशातील संरक्षण उत्पादनामध्ये वाढ व्हावी यासाठी मोदी सरकारने या क्षेत्रात ७४ टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.
- संपूर्ण संरक्षण कवच प्रणाली देशातच तयार व्हावी यासाठी मोदी सरकारने 'मिशन सुदर्शन चक्र' हे अभियान सुरू केले आहे. २०३५ पर्यंत हे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार मोदी सरकारने केला आहे.
- अमेरिका, फ्रान्स, फिलीपाईन्स, अल्मेनिया यासारख्या १०० देशांना भारत संरक्षण उत्पादनांची निर्यात करत आहे. भारतीय शस्त्रास्त्रांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे.
- बुलेटप्रुफ जॅकेट, डॉर्नियर (डीओ-२२८) एअर क्राफ्ट, चेतक हेलिकॉप्टर, इंटरसेप्टर बोटी आणि हलक्या वजनाची ट्रॉपीडो यासारख्या उत्पादनांची भारताकडून निर्यात होत आहे.




## संरक्षण निर्यातीत ऐतिहासिक यश

- २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताने तब्बल ९० हून अधिक देशांना संरक्षण उपकरणे आणि शस्त्रास्त्रे निर्यात केली आहेत! ही निर्यात त्याआधीच्या वर्षाच्या तुलनेत ३२.५% अधिक आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षांत भारताने २३ हजार ६२२ कोटी एवढ्या रकमेच्या संरक्षण उत्पादनाची निर्यात केली.
- २०१४ पर्यंत सरकारी क्षेत्रातील कंपन्यांकडून लोकांना अपेक्षाच नव्हत्या. त्याच कंपन्यांनी गेल्या ११ वर्षांत कमाल केली आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (BEL), भारत डायनॅमिक्स लिमिटेड (BDL), मझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (MDL) सारख्या कंपन्यांनी भारताच्या या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
- फक्त सरकारी कंपन्या नव्हे, तर खासगी क्षेत्रातील टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स, लार्सन अँड टुब्रो, भारत फोर्ज, अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस यांसारख्या डझनभर कंपन्यांनीही संरक्षण उत्पादनात मोठे योगदान दिले आहे.

प्रत्येक घरी स्वदेशी
घरो-घरी स्वदेशी

खादी

# भारताची खादी गेली जागतिक व्यासपीठावर

**महात्मा गांधींनी स्वदेशी वस्तूंच्या वापराचे आव्हान केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच भूमिकेतून स्वदेशी उत्पादने खरेदी करण्याचे आवाहन (व्होकल फॉर लोकल) केले आहे. मोदी सरकारच्या प्रोत्साहानामुळे देशातील खादीच्या विक्रीत गेल्या ११ वर्षात ७ पटीने वाढ झाली आहे.**



### उत्पादनातील मोठी वाढ

2013-14: **26,109** कोटी

2024-25: **1,16,600** कोटी

### विक्रीतही प्रचंड वाढ

2013-14: **31,154** कोटी

2024-25: **1,70,551** कोटी

### रोजगारात 50 टक्के वाढ

2013-14: **1.30** कोटी लोकांना रोजगार मिळत होता

2024-25: **1.94** कोटी लोकांना रोजगार मिळाला

■ गेल्या ११ वर्षात स्थानिक कारागिरांचे उत्पन्न, वेतन सुमारे २७५ टक्क्यांनी वाढले आहे. गेल्या ३ वर्षात हस्तकला कारागिरांच्या उत्पन्नात १०० टक्के वाढ.

### खादी कपड्यांच्या विक्रीत चौपट वाढ

■ २०१३-१४ मध्ये ८११.८ कोटी रु.चा खादी कपड्याची निर्मिती झाली होती. २०२४-२५ मध्ये ३ हजार ७८३.३६ कोटी रु. किमतीच्या खादी कपड्यांची निर्मिती झाली.

■ खादी कपड्यांच्या विक्रीत गेल्या ११ वर्षात प्रचंड वाढ झाली. २०१३-१४ मध्ये खादी कपड्यांची विक्री १०८१.४ कोटी रु. एवढी होती. २०२४-२५ च्या पहिल्या आर्थिक तिमाहीत ही विक्री ७ हजार १४५.६१ कोटी एवढी झाली. याचा अर्थ खादी कपड्यांच्या विक्रीत ५६१ टक्के वाढ झाली.

### भारतातच नव्हे तर जगातही खादी लोकप्रिय

■ दिल्लीत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नालॉजीच्या सहकार्याने खादी विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्याला मोठा प्रतिसाद मिळतो आहे.

■ उत्पादन आणि विक्री यात समन्वय राखण्यासाठी ई-मार्केट लिंकेजेसचा वापर केला जात आहे. gem.gov.in आणि khadiindia.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून उत्पादकांना जोडण्यात आले आहे.

■ देशातील अनेक शहरांमध्ये खादी विक्रीसाठी विशेष केंद्र सुरू करण्यात आले आहेत.

■ खादी ब्रॅण्डचे जागतिक बाजारपेठेत बनावट मालापासून रक्षण करण्यासाठी खादी आणि खादी इंडिया लोगो या ट्रेडमार्कचे अनेक देशांमध्ये रजिस्ट्रेशन करण्यात आले आहे.

खादी आणि ग्रामोद्योग विभागातर्फे दरवर्षी २ ते २३ ऑक्टोबरपर्यंत खादी महोत्सव आयोजित केला जातो. त्यातूनही खादी उत्पादनांची विक्री वाढत आहे.



# गेल्या १० वर्षात भारताची अर्थव्यवस्था ९० टक्क्यांनी वाढली

**असे भारत सरकार नाही, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा डेटा म्हणतोय..**

२०१४ ते २०२४ या १० वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ९०% वाढली. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये ही वाढ सर्वाधिक आहे. याच काळात, अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतात पंतप्रधान असताना इतर देशांचा जीडीपी २०१४ च्या तुलनेत गेल्या १० वर्षांत किती वाढला बघूया...




| | | |
|---|---|---|
| अमेरिका | : | ६०% वाढ. |
| चीन | : | ८३.५% वाढ. |
| जर्मनी | : | १९.३८% वाढ. |
| जपान | : | (-)१९.१८% घसरण. |
| इंग्लंड | : | २०.०२% वाढ. |
| फ्रान्स | : | ७.८१% वाढ. |
| इटली | : | ५.३% वाढ. |
| ब्राझील | : | (-)१२.०५% घसरण. |
| कॅनडा | : | १५.८१% वाढ. |

प्रत्येक घरी स्वदेशी
घरो-घरी स्वदेशी



## खेळणी

# खेळणी निर्मिती उद्योगाला प्रोत्साहन

ऑगस्ट २०२० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये देशात खेळणी निर्मिती उद्योगाला प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली होती. त्यानंतर खेळणी निर्मिती उद्योगाचे स्वरूप बदलून गेले. ५ वर्षा पूर्वीपर्यंत देशात खेळण्यांची प्रचंड आयात होत असे. आता परिस्थिती बदलली आहे. भारतातून १५३ देशांना खेळण्याची निर्यात होत आहे.

### खेळणी उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेले निर्णय

**खेळण्यांची आयात ५२ टक्क्यांनी घटली**

2014-15: 332.55 दशलक्ष डॉलर्स
2022-23: 158.66 दशलक्ष डॉलर्स


**निर्यात २३९ टक्क्यांनी वाढली**

2014-15: 96.17 दशलक्ष डॉलर्स
2022-23: 325.72 दशलक्ष डॉलर्स



- १ जानेवारी २०२१ पासून खेळण्यांसाठी इंडियन स्टॅंटर्ड ब्युरोचे प्रमाणपत्र मिळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळणी उत्पादन, विक्री, निर्यात आदी करता येत नाही.
- इंडियन स्टॅंटर्ड ब्युरोने १६७७ देशांतर्गत खेळणी उत्पादकांना आणि ४६ विदेशी उत्पादन केंद्रांना परवानगी दिली आहे.
- नॅशनल टॉय ॲक्शन प्लान, ई टॉयकॅथॉन २०२५ यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे दर्जेदार खेळणी निर्मितीला चालना मिळाली.
- आयात खेळण्यांचे सॅम्पल टेस्टींग बंधनकारक करण्यात आले. आवश्यक अटी पूर्ण न झाल्यास आयात खेळण्यांना विक्रीस परवानगी दिली जात नाही.
- देशभरात १९ टॉय क्लस्टरना परवानगी देण्यात आली. यात ७ राज्यातील ११ हजार कारागिरांचा समावेश करण्यात आला आहे.
- खेळणी निर्मिती उद्योगासाठी नवीन इन्सेंटिव्ह योजना सुरू करण्याचा विचार.

खेळणी निर्मिती उद्योगात १०० टक्के विदेशी गुंतवणुकीत परवानगी देण्यात आली आहे. त्याचाही फायदा या क्षेत्राला झाला आहे.



### वंदे भारत एक्स्प्रेस, तेजस ....
### 'मेक इन इंडिया'च्या अनेक यशोगाथा

११ वर्षांपूर्वी 'मेक इन इंडिया' उपक्रम सुरू करण्यात आला होता. मिग-२१ पासून LC तेजस Mk1 पर्यंतच्या प्रवासात पण मेक-इन-इंडियाचा मोठा वाटा आहे. या विमानात ६४% पेक्षा जास्त स्वदेशी तंत्रज्ञान, UTTM² एड रडार आणि स्वयम् रक्षाकवचचा समावेश आहे. या विमानासाठी तब्बल १०५ भारतीय कंपन्या घटकांचे उत्पादन करत आहेत!

मेक-इन-इंडिया उपक्रम सुरू झाल्यापासून गेल्या ११ वर्षात विक्रांत युद्धनौकेपासून वंदेभारत एक्सप्रेस, आकाशपासून अरिहंत, पृथ्वीपासून पिनाका, स्टार्ट-अपपासून सेमीकंक्टर, ईव्ही पासून इ-कॉम क्रांती, ध्रुवपासून धनुष्य, मंगलयान पासून मेट्रो, सोलार पॅनलपासून स्कॉर्पिनपर्यंत डिफेन्स, रेल्वे, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, स्पेस इत्यादी क्षेत्रात 'मेक-इन-इंडिया'च्या शेकडो यशोगाथा आपण रोज बघत आहोत.

प्रत्येक घरी स्वदेशी
घरो-घरी स्वदेशी

## औषधे


# भारतीय औषध निर्मिती क्षेत्राचा प्रभाव जगभरात

**भारतीय औषध निर्मिती उद्योग वेगाने वाढतो आहे. त्याचबरोबर भारतीय औषधांवरील विश्वास जगभरात वाढतो आहे. भारतीय औषधांनी जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण केले आहे. भारतीय औषध उद्योगाने जगातील जेनेरीक औषधांच्या एकूण मागणीपैकी २० टक्के उत्पादन करण्यात यश मिळवले आहे. परवडणाऱ्या दरात औषध निर्मिती करून भारतीय उत्पादकांनी जगभरात प्रभाव निर्माण करण्यात यश मिळवले आहे.**

**10,400**

कोटी रु. एवढ्या विक्रीचा टप्पा गाठला. ५ हजार कोटी किमतीची औषधे भारताने निर्यात केली आहेत.

**औषध निर्यातीत वाढ**




औषध निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची भारत अनेक वर्षे आयात करत होता. आता मात्र अशा कच्च्या मालाची भारतातून निर्यात होऊ लागली आहे. २०२४-२५ मध्ये २ हजार २८० कोटींची निर्यात झाली.

■ नॅफीथोमायसिन नावाचे पहिले मॅक्रोलाईड प्रतिजैविक तयार करण्यात भारताला यश आले आहे. भारताच्या औषध संशोधन क्षेत्रातील हा महत्वाचा टप्पा आहे.

■ एमआरआय, अल्ट्रासाऊंड, सीटीस्कॅनर, मॅमोग्राफी अशा अनेक यंत्रांची भारतात आयात केली जात होती. सी-आर्म, एक्स-रे मशीन, लायनर ॲक्सीलेटर यांचीही आयात करावी लागत होती. मोदी सरकारने सुरु केलेल्या प्रोत्साहन योजनेनुसार वर उल्लेख केलेल्या अनेक यंत्रांची निर्मिती भारतात होऊ लागली आहे.

■ औषध उत्पादन क्षेत्रासाठी मोदी सरकारने उत्पादनावर आधारीत अनुदान योजना (पीएलआय) सुरू केली. गेल्या ६ वर्षात या योजनेतून १५ हजार कोटींचे अनुदान देण्यात आले. त्यामुळे जून २०२५ पर्यंत या क्षेत्रात ३८ हजार ५४३ कोटी एवढी गुंतवणूक झाली आहे.

■ २ लाख ८९ हजार ६०६ कोटींची औषधे व अन्य उत्पादने विकली गेली. १ लाख ८६ हजार ७१ कोटी रु. एवढ्या किमतीच्या औषधांची निर्यात झाली.

■ पेनिसिलिन-जी सारखी औषधे भारतात तयार होऊ लागली आहेत. मोदी सरकारच्या निर्णयांचा परिणाम हळूहळू दिसू लागला आहे.



वैद्यकीय उपकरणे आणि औषध निर्मितीसाठी देशातील उत्पादकांना **3,420** कोटी रु. एवढे उत्पादनावर आधारीत अनुदान देण्यात आले.

### स्वदेशी 'स्पेस स्टेशन' उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प!

■ 'भारतीय अंतरिक्ष स्थानक' हा प्रकल्प २०३५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य असून, यामुळे भारत जागतिक अंतराळ महासत्ता म्हणून असलेले स्थान अजून बळकट करणार आहे.

■ या स्पेस स्टेशनचे वजन सुमारे ५० टन असेल आणि ते पृथ्वीपासून सुमारे ४०० किमी उंचीवर कक्षेत स्थिरावले जाईल.

■ येथे अंतराळवीर एका वेळी ३ ते ६ महिने राहून विविध वैज्ञानिक प्रयोग करत राहतील.

■ या प्रकल्पाचा उद्देश दीर्घकालीन मानवी अंतराळ मोहिमा आणि कृषी, दूरसंचार, हवामान व डिफेन्स (4th Dimension) शी संबंधित संशोधन व त्यानुसार प्रणालींचा विकास करणे हा आहे.

■ या प्रकल्पाचे नेतृत्व ISRO चे अध्यक्ष डॉ.व्ही. नारायणन स्वतः करत आहेत, जे क्रायोजेनिक इंजिनियरिंग आणि रॉकेट तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ आहेत.

प्रत्येक घरी स्वदेशी
घरो-घरी स्वदेशी

## दूरसंचार

# मोबाईल फोन उत्पादनात देश झाला स्वयंपूर्ण

**२०१४ पर्यंत भारतात इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि मोबाईल फोनची मोठ्या प्रमाणात आयात केली जात होती. गेल्या ११ वर्षात हे चित्र पूर्णपणे पालटले असून इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा मोठा निर्यातदार देश अशी भारताची ओळख झाली आहे.**



### इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे उत्पादन


(गेल्या ११ वर्षात उत्पादनात ६ पट वाढ.)






### इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्यात

(गेल्या ११ वर्षात उत्पादनात ८ पट वाढ.)




- २०१४-१५ मध्ये देशात मोबाईल तयार करणारे फक्त दोनच कारखाने होते. २०२४-२५ मोबाईल उत्पादन करणारे ३०० कारखाने आहेत.
- २०१४-१५ मध्ये १८ हजार कोटी रु. किमतीच्या मोबाईल फोनचे उत्पादन झाले. २०२४-२५ मध्ये ५.४५ लाख कोटी रु. किमतीच्या मोबाईलचे उत्पादन झाले. उत्पादनात २८ पट वाढ.
- २०१४-१५ मध्ये १५०० कोटी रु. किमतीचे मोबाईल फोन निर्यात झाले. २०२४-२५ मध्ये २ लाख कोटी किमतीच्या मोबाईल फोनची निर्यात झाली. निर्यातीत १३२ पट एवढी दणदणीत वाढ
- २०१४-१५ मध्ये एकूण मागणीच्या ७५ टक्के एवढे मोबाईल आयात करावे लागत होते. आता भारतातील मोबाईल फोनचे उत्पादन वाढल्यामुळे आयात ०.२ टक्क्यांवर आली आहे.





भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाचा मोबाईल निर्यातदार देश बनला आहे.

### भारतातील सेमीकंडक्टर क्रांती

**सेमीकंडक्टर** चीपसाठी अन्य देशांवर अवलंबून असलेला भारत आता या चीपची निर्मिती करणार आहे. इंडिया सेमी कंडक्टर मिशनअंतर्गत १० सेमीकंडक्टर कारखान्यांना मंजूरी देण्यात आली आहे. या कारखान्यांचे बांधकाम वेगाने सुरू आहे. आज आपण आत्मविश्वासाने म्हणू शकतो की यावर्षी पहिली 'मेड इन इंडिया' चिप बाहेर येईल. साणंदमध्ये एका युनिटमध्ये पथदर्शी उत्पादनरेषा सुरू झाली आहे व एका वर्षात आणखी चार युनिट्समध्ये उत्पादन सुरू होण्याची अपेक्षा आहे. मोहाली येथील सेमीकंडक्टर लॅबोरेटरी (एससीएल)मध्ये १७ संस्थांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आधीच २० चिप्स तयार केल्या आहेत. येत्या काही महिन्यांत अशा आणखी चिप्स तयार केल्या जातील. या क्षेत्रातील जागतिक कंपन्यादेखील भारताच्या प्रतिभेमध्ये गुंतवणूक करत आहेत. 'लॅम रिसर्च' भारतात ६० हजार अभियंत्यांना प्रशिक्षण देणार आहे.

# जीएसटी दर कपातीमुळे देशभर 7 लाख कोटींची महाविक्रमी उलाढाल

● वेद कुमार

■ मारुती सुझुकीने नवरात्रीदरम्यान GST सुधारणा लागू झाल्यानंतर फक्त ८ दिवसांत १.६५ लाख गाड्यांची विक्री केली!

■ याच काळात महिंद्रा कंपनीची विक्री ६०% ने वाढली!

■ टाटा मोटर्सने पण याच काळात ५०,००० हून अधिक गाड्या विकल्या आहेत.

■ हिरो मोटर्सने सप्टेंबर महिन्यात आपल्या इतिहासातील सर्वाधिक विक्रीचा विक्रम प्रस्थापित केला.

■ ह्युंदाईच्या SUV विक्रीने कंपनीच्या एकूण विक्रीपैकी ७२% हून अधिक वाटा मिळवला असून, गेल्या ५ वर्षांतील सर्वाधिक एकदिवसीय डीलर बिलिंगचा विक्रम या नवरात्रीत त्यांनी नोंदवला आहे.

■ एसी विक्रीत दुप्पट वाढ झाली आहे.

■ यंदा स्मार्टफोन निर्यातीत भारताने चीनला मागे टाकत अमेरिकेत सर्वाधिक मार्केट-शेयरवर कब्जा केला आहे!

■ Haier आणि LG सारख्या मोठ्या इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांनी नवरात्रीदरम्यान मागील वर्षाच्या तुलनेत 'उच्च डबल-डिजिट' अंकात विक्रीवाढ नोंदवली आहे.

■ भारताने गेल्या दशकातील सर्वाधिक नवरात्रीकाळातील विक्रीचा विक्रम नोंदवला असून, यावर्षी सणासुदीच्या काळात नवरात्री पासून एकूण विक्री १४ लाख कोटींपर्यंत पोहोचल्याचा अंदाज आहे.

■ ऑक्टोबर २०२५ मॉर्गन स्टॅन्ले अहवालानुसार, भारतीय घरांमधील सोन्याचा साठा सुमारे ३.८ ट्रिलियन डॉलर्स एवढा झाला आहे, ज्यामध्ये ६२%ची प्रचंड वाढ नोंदवली गेली आहे.

■ ८५ इंच टीव्हीचा बाजारातील ९९% स्टॉक विक्री झाला आहे! टीव्ही उत्पादन कंपन्यांनी ३० ते ३५% वाढीची नोंद विक्रीत केली आहे.

■ ई-कॉमर्स विक्री १.२ लाख कोटींवर पोहोचली आहे, ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत २७% वाढ दिसून येत आहे.




■ क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सने सणासुदीच्या काळात FMCG ऑर्डरमध्ये ८५% प्रमाणात वाढ नोंदवली!

फक्त काहीच उदाहरणे मी इथे दिली आहेत, अभिमान वाटेल असे अजून पन्नास आकडे देता येतील. पण इकडे लक्षात घ्या की ही सगळी आकडेवारी वर्षभराची नाहीये तर ट्रम्प यांच्या टॅरिफ धमक्या आणि राहुल गांधी यांच्या 'डेड इकॉनॉमी' नंतरची आहे! सणासुदीची खरेदी, इतर अनेक इलेक्ट्रॉनिक गुडस, कापड व गारमेंट्सची विक्रमी विक्री, प्रॉपर्टीचे व रियल इस्टेट व्यवहार, पर्यटन हंगाम, परदेशी गुंतवणूक, डिफेन्स डिल्स इत्यादींची आकडेवारी पण तेवढीच शानदार आहे. अजूनही 'फेस्टिव्ह-सिझन' सुरूच असल्याने ती आकडेवारी अजून मोठ्या प्रमाणात रोजच्या रोज वाढत आहे आणि अपडेट होत आहे. ती आकडेवारी येईल तेंव्हा विरोधकांना तोंड लपवायला पण जागा राहणार नाहीये एवढं नक्की. पण ट्रम्प यांच्या 'टॅरिफ'च्या धमक्या आणि राहुल गांधी यांच्या 'डेड-इकॉनॉमी'च्या अपप्रचाराला भारतीयांनी देशाच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत 'मूँहतोड जवाब' दिला आहे हे मात्र खरं आहे. कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नका.

भारतीय अर्थव्यवस्था सुरक्षित हातांमध्ये आहे आणि जोपर्यंत असे प्रखर राष्ट्रनिष्ठ सरकार देशात आपल्या सेवेत राहणार, तोपर्यंत आपली अर्थव्यवस्था अजून भक्कमच होत राहणार आहे. ■

# दिवाळीत स्वदेशी शिवकाशी फटाक्यांची विक्रमी विक्री

**पंतप्रधान** मोदी यांनी केलेल्या अपील नंतर देशभरातील सनातनी हिंदूंनी यावर्षी चायनीज फटाके नाकारून 'मेड इन इंडिया' फटाक्यांना प्राधान्य दिलं. परिणामी, या दिवाळीत तमिळनाडूतील शिवकाशीने तब्बल ७ हजार कोटींच्या फटाक्यांची विक्री करून विक्रमी यश मिळवलं आहे!

यावर्षी देशभरातील सनातनी हिंदूंनी, अगदी ठरवून, चायनीज फटाके नाकारले आणि मेड इन तमिळनाडू फटाके फोडले. या फटाक्यांनी देशभर आतिषबाजी झाली एवढंच नाही, तर शिवकाशीचा प्रत्येक कारखाना, प्रत्येक कामगार, प्रत्येक घर पण त्यामुळे उजळलं. ज्यांनी 'सनातन संपवू' असं म्हटलं, त्यांच्याच राज्यात सनातन धर्मानं एका संपल्यात जमा असलेल्या उद्योगाला 'ऑक्सिजन' दिला, त्या उद्योगावर अवलंबून असलेल्या हजारो लोकांच्या घरी प्रकाश आणला, डिमांड अशी वाढली की नवीन रोजगार दिला आणि हजारो कुटुंबांच्या जीवनात समृद्धी आणली. सनातन संपवायची भाषा करणाऱ्या नालायक राज्यकर्त्यांमुळेच 'संपलेल्या'



शिवकाशीच्या फटाके उद्योगाला सनातनने नवसंजीवनी दिली. हा असा आहे माझा सनातन धर्म!

'शिवकाशी' हे फक्त व्यापारी यश नाही. 'शिवकाशी' हा भारतीय अस्मितेचा पण विजय आहे. 'शिवकाशी' आत्मनिर्भर भारत आणि मेड-इन-इंडियाचं यश आहे. 'शिवकाशी'चं यश त्या प्रत्येक हाताचा सन्मान आहे ज्याने स्वदेशी फटाके बनवले. 'शिवकाशी'चं यश त्या प्रत्येक हाताचाही सन्मान आहे ज्याने स्वदेशीच फटाके फोडले. सनातन संपवायच्या विषारी भाषेवर 'शिवकाशी'चं यश हा अँटी-डोट आहे. ■

## खेळणी आणि हस्तशिल्प स्वस्त



हस्तशिल्पाच्या मूर्ती, प्रतिमा, चित्रे, लाकूड/धातू/कपड्यांच्या बाहुल्या, खेळणी, हस्तनिर्मित कागद, कागदी फलक, मानवनिर्मित शिलाई धागा आणि सूत यांवरचा वस्तू आणि सेवा कराचा दर आता १२% वरून कमी होऊन ५% होईल. तर, इन्व्हर्टेड शुल्क संरचनेअंतर्गत मानवनिर्मित फायबरवील वस्तू आणि सेवा कराच दर १८% वरून कमी करून ५% आणि मानवनिर्मित सूतावरील कर १२% वरून कमी करून ५% करून, यात दुरुस्ती केली ठोली आहे. या लाभ देशाच्या टॉय खेळणी उद्योठक्षेत्राला मिळेल आणि स्वस्त विदेशी खेळण्यांमुळे स्थानिक उत्पादकांची विक्रीही वाढेल.

**फायदा:** मानवनिर्मित फायत्वर धाग्यासाठी शुल्काचा आराखडा निश्चित केल्याने वस्त्रोद्योग क्षेत्रातील स्पर्धात्मकता आणि विशेषतः निर्यातीत सुधारणा होईल. कारागिरांच्या उपजीविकेला मदत मिळेल, भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणसोबत ग्यामीण आर्थिक विकासालाही चालना मिळेल.

# दिवाळीत एका दिवसात एका लाखांहून अधिक कारची खरेदी



**धनत्रयोदशीच्या** दिवशी दुपारी १२:१८ वाजता शुभ मुहूर्त सुरू झाला आणि रविवारी दुपारी १:५१ वाजेपर्यंत चालला. या काळात शोरूम रात्री उशिरापर्यंत उघडे होते. ग्राहकांनी यादिवशी विक्रमी खरेदी केली. या दिवाळीत भारतातील प्रवासी वाहन बाजारपेठेत मोठी तेजी दिसून येत आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी, वाहन उत्पादकांनी केवळ विक्रीचे विक्रमच मोडले नाहीत तर एकाच दिवसात १,००,००० हून अधिक वाहने वितरित करण्याचा टप्पाही गाठला. उद्योग सूत्रांनुसार, ही विक्री दररोज ८ हजार ५०० ते १० हजार कोटींच्या दरम्यान आहे. प्रति वाहन सरासरी ८.५ ते १० लाख किंमत गृहीत धरून ही आकडेवारी मोजली जाते.

धनत्रयोदशीच्या दिवशी मारुती सुझुकी इंडिया, टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स आणि ह्युंदाई मोटर इंडिया सारख्या प्रमुख कंपन्यांनी विक्रमी विक्री नोंदवली. जीएसटी २.० मधील सवलत आणि ग्राहकांच्या उत्साहामुळे हे घडले. छोट्या गाड्यांची मागणी अचानक वाढली आहे. पूर्वी, दररोज जास्तीत जास्त ७५ हजार ते ८० हजार वाहनांची विक्री आता या आकड्याने ओलांडली आहे.

### मारुती सुझुकीने नवा विक्रम रचला

देशातील सर्वात मोठी कार उत्पादक कंपनी असलेल्या मारुती सुझुकी इंडियाने धनत्रयोदशीच्या दिवशी आतापर्यंतची सर्वाधिक विक्री केली. पहिल्यांदाच ५० हजार युनिट्सचा टप्पा ओलांडला. गेल्या वर्षीच्या ४२ हजार युनिट्सपेक्षा ही २० ते २५ टक्के वाढ आहे.

### टाटा आणि ह्युंदाईनेही दाखवली त्यांची ताकद

धनत्रयोदशी आणि दिवाळीच्या काळात विक्रीत ६६ टक्के वाढ होण्याची अपेक्षा टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्सना आहे. गेल्या वर्षी १५ हजार युनिट्सची डिलिव्हरी झाली होती, परंतु यावर्षी ही संख्या २५,००० पर्यंत पोहोचू शकते. कंपनीचे मुख्य व्यावसायिक अधिकारी अमित कामत म्हणाले की, यावर्षी डिलिव्हरी दोन ते तीन दिवसांत पसरल्या आहेत. ग्राहक शुभ मुहूर्तानुसार येत आहेत. मागणी मजबूत आहे. जीएसटी २.० ने वाढीला आणखी गती दिली आहे. नवीन जीएसटी दरांमुळे ४ मीटर लांबीच्या कारवरील कर २८ टक्क्यांवरून १८ टक्के झाला आहे. १,२०० सीसीपर्यंत इंजिन असलेल्या कारवरील सेस काढून टाकण्यात आला आहे. यामुळे लहान कार अधिक परवडणाऱ्या झाल्या आहेत. ग्राहकांना आता त्या खरेदी करणे अधिक सोयीस्कर झाले आहे. ■

# चिनी उत्पादनांची कमी विक्री, 87% लोकांनी भारतीय वस्तू खरेदी केल्या

**या** दिवाळीत, उत्सवी व्यापार २५% वाढून ६.०५ लाख कोटी झाला. यापैकी ५.४० लाख कोटी वस्तूंच्या विक्रीतून आणि ६५,००० कोटी सेवांमधून मिळाले. गेल्या वर्षी, २०२४ मध्ये, हा आकडा ४.२५ लाख कोटी होता. २१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रकाशित झालेल्या दिवाळी उत्सव विक्री २०२५ वरील संशोधन अहवाल या शीर्षकाच्या CIT अहवालात हे आकडे उघड झाले आहेत, जे राज्यांच्या राजधान्या, टियर-२ आणि टियर-३ शहरांसह ६० प्रमुख वितरण केंद्रांच्या सर्वेक्षणावर आधारित आहे.

### भारतीय उत्पादनांची विक्री जास्त, चिनी उत्पादनांची मागणी कमी

यावर्षी, ८७% ग्राहकांनी भारतीय बनावटीच्या वस्तू निवडल्या, ज्यामुळे चिनी उत्पादनांची मागणी कमी झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत भारतीय उत्पादनांची विक्री २५% वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. व्होकल फॉर लोकल आणि स्वदेशी दिवाळीचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला.

- एकूण व्यापारापैकी ८५% व्यापार नॉन-कॉर्पोरेट आणि लेगसी मार्केटमधून झाला.
- ग्रामीण आणि निमशहरी भागांचाही २८ टक्के वाटा होता.
- म्हणजेच, मोठ्या मॉल्सपेक्षा भौतिक बाजारपेठांनी जास्त परतावा दिला आहे.

### जीएसटी दरात कपात झाल्यामुळे यावेळी वस्तूंची मागणी वाढली

कमी जीएसटी दरांचे फायदे स्पष्ट होते. ७२% व्यापाऱ्यांनी पादत्राणे, कपडे, मिठाई, गृहसजावट आणि ग्राहकोपयोगी वस्तू यासारख्या दैनंदिन वापराच्या वस्तूंवर सवलतींमुळे विक्रीचे प्रमाण वाढल्याचे सांगितले. सरकारने जीएसटी कपात केल्याने उत्सवाचा उत्साह आणखी वाढला.

### एकूण विक्रीत किराणा आणि एफएमसीजीचा वाटा १२% होता

सीएआयटीचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी. भारतीय म्हणाले की, क्षेत्रनिहाय, किराणा आणि एफएमसीजीचा एकूण विक्रीत १२% वाटा आहे. त्यानंतर...

- सोने आणि दागिने १०%, गृहसजावट आणि फर्निचर एकत्रित १०%, इलेक्ट्रॉनिक्स ८%, ग्राहकोपयोगी वस्तू ७%, तयार कपडे ७%, भेटवस्तू ७%.
- मिठाई आणि नाश्त्याचा वाटा ५%, कापड ४%, पूजा साहित्य ३%, फळे आणि सुकामेवा ३%, बेकरी ३% आणि पादत्राणे २%. विविध वस्तूंचा वाटा १९% होता.
- पॅकेजिंग, हॉस्पिटॅलिटी, कॅब सेवा, प्रवास, कार्यक्रम व्यवस्थापन, तंबू आणि सजावट, मनुष्यबळ आणि वितरण यासारख्या सेवा क्षेत्रांनी सुमारे ६५,००० कोटी रुपयांची उलाढाल केली.

### लॉजिस्टिक्स आणि पॅकेजिंगमध्ये ५० लाख तात्पुरत्या नोकऱ्या निर्माण झाल्या

जवळजवळ ५० लाख तात्पुरत्या नोकऱ्या निर्माण झाल्या. या नोकऱ्या लॉजिस्टिक्स, पॅकेजिंग, वाहतूक आणि किरकोळ सेवांमध्ये निर्माण झाल्या. नॉन-कॉर्पोरेट क्षेत्र, ज्यामध्ये ९० दशलक्ष लघु व्यवसाय आणि लाखो उत्पादन युनिट्स आहेत, हे भारताच्या विकासाचे इंजिन ठरले.

### व्यापारी आणि ग्राहकांचा विश्वास दशकातील सर्वोच्च पातळीवर

यावेळी, दोन्ही बाजूंनी आत्मविश्वास उच्च पातळीवर पोहोचला. ट्रेडर कॉन्फिडन्स इंडेक्स (TCI) १० पैकी ८.६ वर पोहोचला आणि कंझ्युमर कॉन्फिडन्स इंडेक्स (CCI) ८.४ वर पोहोचला.

### जीएसटी सुसूत्रीकरणामुळे ग्राहकांना प्रेरणा मिळाली

दिल्लीतील चांदणी चौक येथील खासदार आणि सीएआयटीचे सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल म्हणाले, या विक्रीवरून असे दिसून येते की जीएसटीचे सुसूत्रीकरण आणि स्वदेशीचा स्वीकार यामुळे व्यापारी समुदाय आणि ग्राहक दोघांनाही प्रेरणा मिळाली आहे. **(सौजन्य: दिव्य मराठी)**

# स्वदेशी 'तेजस'ची झेप





नाशिक येथील ओझर येथे तेजस विमानाची पहिली जाहीर हवाई भरारी झाली. यामुळे भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात तेजसचा समावेश होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एचएएल प्रकल्पात तेजस आणि एचटीटी-४० या प्रशिक्षणाच्या विमानांच्या उत्पादन साखळीचा प्रारंभ झाला. यामुळे विमानांचे उत्पादन वाढणार आहे. संरक्षण क्षेत्रातील स्वयंपूर्णतेवर भर दिला जात आहे. इंजिन आणि सेन्सर्ससारख्या महत्त्वाच्या सामग्री उत्पादनात आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे.

**नाशिक** येथे 'तेजस' या स्वदेशी बनावटीच्या हलक्या लढाऊ विमानाची एमके१ आवृत्तीने पहिली जाहीर हवाई भरारी घेतली. यामुळे भारतीय हवाई दलात या विमानांचा समावेश होण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. अनेक वर्षांपासून हवाई दलाचा कणा असलेल्या 'मिग २१' विमानांची जागा घेण्यासाठी 'तेजस'ची वाट पाहिली जात होती. दोन महिन्यांपूर्वी 'मिग २१' निवृत्त झाले आणि हवाई दलातील लढाऊ विमानांची संख्या कमी होत असताना, 'तेजस'च्या उत्पादनाचा वेग कमी असल्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला होता. या पार्श्वभूमीवर, नाशिक येथील ओझर येथील हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) प्रकल्पात 'तेजस'च्या उड्डाणासोबतच तिच्या तिसऱ्या उत्पादन साखळीची सुरुवात झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते एचटीटी-४० या प्रशिक्षणासाठीच्या विमानाची दुसरी उत्पादन साखळीही सुरू झाली.

यामुळे दरवर्षी आठ 'तेजस' विमानांचे उत्पादन होईल, जे वाढवून दहापर्यंत नेता येईल. एचएएल प्रकल्पातून एकूण दरवर्षी २४ विमानांचे उत्पादन अपेक्षित आहे. 'तेजस'चे राष्ट्रार्पण झाले असले तरी, अंतिम प्रमाणपत्र आणि शस्त्रास्त्रांशी जोडणीसारखी कामे अजून पूर्ण व्हायची आहेत. 'तेजस' स्वदेशी असले तरी, त्याचे इंजिन मात्र परदेशी कंपन्यांकडून घ्यावे लागते. ही उणीव भरून काढणे हे भारतीय उद्योग आणि संरक्षण सामग्री उत्पादकांसाठी मोठे आव्हान आहे. 'मिग २१'च्या निवृत्तीनंतर आता हवाई दलाचा भार 'सुखोई ३० एमके आय', 'राफेल' आणि 'तेजस' या तीन लढाऊ विमानांवर आहे. आधुनिक युद्धात हवाई दलाची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे गेल्या काही वर्षांत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे लढाऊ विमानांच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता येणार नाही. राजनाथ सिंह यांनी 'तेजस'च्या निमित्ताने संरक्षण क्षेत्रातील स्वयंपूर्णतेचा जो मुद्दा मांडला, तो खूप महत्त्वाचा आहे. संरक्षण क्षेत्रातील एकूण उत्पादनापैकी ६५ टक्के उत्पादन देशात होणे ही एक चांगली गोष्ट आहे. भारत अनेक वर्षांपासून परदेशी उत्पादनांवर अवलंबून होता. पण आता हे अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. त्यामुळे युद्धनौका, लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणाली यांसारख्या अनेक गोष्टी आता देशातच तयार होत आहेत. संरक्षण क्षेत्रात आता आयातीऐवजी निर्यातीवर भर दिला जात आहे. मात्र, इंजिन आणि सेन्सर्ससारख्या महत्त्वाच्या भागांच्या उत्पादनात आत्मनिर्भर होणे, याला आता प्राधान्य देणे गरजेचे आहे.

'तेजस' विमानाने नाशिकमधून यशस्वी उड्डाण केले. हे स्वदेशी बनावटीचे हलके लढाऊ विमान भारतीय हवाई दलात लवकरच सामील होईल. 'मिग २१' विमानांची जागा घेण्यासाठी 'तेजस'ची अनेक वर्षांपासून प्रतीक्षा होती. 'मिग २१' निवृत्त झाल्यानंतर आणि हवाई दलातील विमानांची संख्या कमी होत असताना, 'तेजस'च्या उत्पादनाचा वेग वाढवण्याची गरज जाणवत होती. नाशिक येथील एचएएल प्रकल्पात 'तेजस'च्या नवीन उत्पादन साखळीची सुरुवात झाली. त्याचबरोबर, एचटीटी-४० या प्रशिक्षण विमानाचीही दुसरी उत्पादन साखळी सुरू झाली. यामुळे दरवर्षी ८ 'तेजस' विमानांचे उत्पादन होईल, जे भविष्यात दहापर्यंत वाढवता येईल. एचएएल प्रकल्पातून




एकूण वर्षाला २४ विमानांचे उत्पादन अपेक्षित आहे. 'तेजस'चे उड्डाण झाले असले तरी, त्याचे अंतिम प्रमाणपत्र आणि शस्त्रास्त्र प्रणाली जोडण्याचे काम अजून बाकी आहे. 'तेजस' हे विमान भारतात बनवले जात असले तरी, त्याचे इंजिन मात्र परदेशातून आयात करावे लागते. ही एक मोठी उणीव आहे, जी भारतीय कंपन्यांना भरून काढावी लागेल.

'मिग २१' निवृत्त झाल्यानंतर, भारतीय हवाई दलाकडे आता 'सुखोई ३० एमके आय', 'राफेल' आणि 'तेजस' ही तीन प्रमुख लढाऊ विमाने आहेत. आजच्या युगात हवाई दलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे लढाऊ विमानांच्या बाबतीत कोणतीही तडजोड करणे योग्य नाही. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'तेजस'च्या उड्डाणावेळी संरक्षण क्षेत्रातील स्वयंपूर्णतेवर भर दिला. देशात संरक्षण उत्पादनाचे प्रमाण ६५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे, ही एक चांगली गोष्ट आहे. पूर्वी भारत संरक्षण सामग्रीसाठी परदेशावर खूप अवलंबून होता. पण आता धोरणात्मक बदलांमुळे युद्धनौका, लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली यांसारख्या अनेक गोष्टी देशातच तयार होत आहेत. संरक्षण क्षेत्रात आता आयात कमी आणि निर्यात जास्त करण्यावर भर दिला जात आहे. मात्र, इंजिन आणि सेन्सर्ससारख्या महत्त्वाच्या भागांमध्ये आत्मनिर्भर होणे, हे आता सर्वात मोठे आव्हान आहे. ■

# 'तेजस'च्या निर्मितीतून आत्मनिर्भर भारताचा उदय - राजनाथ सिंह



एचएएलच्या ओझर प्रकल्पात मिग, सुखोई ३०, तेजस आणि प्रशिक्षणार्थी विमानांची निर्मिती होऊन त्यांनी अवकाशात घेतलेले उड्डाण ही देश आणि संरक्षण विभागासाठी अभिमानाची बाब आहे. हे केवळ गौरवाचे उड्डाण नसून, आत्मनिर्भर भारताचे उड्डाण आहे. गेल्या सहा दशकांपासून कार्यान्वित एचएएल संरक्षण उत्पादनांसाठी महत्त्वाचे आहे.

**काही** वर्षांपूर्वीपर्यंत देशाला संरक्षण उत्पादनांबाबत परकीय देशांवर अवलंबून राहावे लागत असे. आता मात्र ६५ टक्के साहित्य देशातच तयार होत आहे. लवकरच सर्व साहित्य देशांतर्गत तयार करण्यात येईल. त्यामुळे देशाचे हवाई दल नवीन तंत्रज्ञानाच्या विमानांमुळे अधिक मजबूत होईल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या ओझर येथील प्रकल्पात तेजस 'एलसीए एमके १ ए'ची तिसरी उत्पादन साखळी आणि 'एचटीटी ४०' या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचा प्रारंभ राजनाथ सिंह यांच्या हस्ते पार पडला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, एचएएलचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. डी. के. सुनील, संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीवकुमार आदी उपस्थित होते.

भारतीय हवाई दलाला मार्क १ ए लढाऊ विमानांचा पुरवठा जलदगतीने करण्यासाठी, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने महाराष्ट्रातील नाशिक येथे तिसरी उत्पादन लाइन सुरू केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या लाइनचे उद्घाटन केले. नाशिकमधील ओझर येथील सुविधा केंद्रात तयार केलेल्या पहिल्या हलक्या लढाऊ विमानाने नुकतेच पहिले उड्डाण केले.

१९ ऑगस्ट रोजी केंद्र सरकारने हवाई दलासाठी ९७ तेजस लढाऊ विमानांच्या खरेदीला मंजुरी दिली, त्यानंतर २५ सप्टेंबर रोजी संरक्षण मंत्रालयाने एचएएलला हे कंत्राट दिले. केंद्र सरकारने या विमानांसाठी एचएएलसोबत ६२,३७० कोटी रुपयांचा करार केला आहे. मार्क १ए हे सिंगल-इंजिन तेजस विमानाचा नवा अवतार अर्थात प्रगत आवृत्ती आहे. हे चौथ्या पिढीतील हलके लढाऊ विमान आहे. ते वजनाने हलके असले तरी फार वेगवान आहे.

तेजस मार्क-१ए चे ६५ टक्केपेक्षा जास्त घटक भारतात तयार केले जातात. देशातील ५०० हून अधिक देशांतर्गत कंपन्यांनी संयुक्तपणे हे उत्पादन केले आहे. म्हणूनच त्याला स्वदेशी तेजस असेही म्हटले जात आहे. मार्क १ ए तेजसला जलतुषारांच्या फवाऱ्यांनी सलामी देण्यात आली.

## पंतप्रधान मोदींचीही तेजस भरारी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ नोव्हेंबर २०२२ रोजी बंगळुरूमध्ये तेजस लढाऊ विमानातून उड्डाण केले. भारतीय पंतप्रधानांनी लढाऊ विमानातून केलेला हा पहिलाच प्रवास होता.

## मिग-२१ विमानांना पर्याय

मार्क-१९ विमानांची तुकडी ही हवाई दलाच्या मिग-२१ ताफ्याचा पर्याय आहे. मिग-२१ विमानांना २६ सप्टेंबर रोजी हवाई दलाने निरोप दिला. या विमानांनी आपल्या ६२ वर्षांच्या सेवेत, १९७१ च्या युद्धात, कारगिलमध्ये आणि अनेक मोठ्या मोहिमांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तेजसची जुनी आवृत्तीदेखील एचएएलने विकसित केली होती. ती एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सी (एडीए) आणि डीआरडीओ यांच्या सहकार्याने विकसित केली गेली होती. ती हवा, पाणी आणि जमिनीवरील हल्ल्यांसाठी डिझाइन केलेली आहे. कठीण परिस्थितीतही ते लक्ष्यांवर हल्ला करू शकते.

- वेग २२०५ किमी प्रति तास
- लांबी १३.२० मी
- उंची ४.४० मी
- वजन ६५०० कि
- ५० हजार फूट उंचीवरून उड्डाण
- एकाच वेळी ३००० किलोमीटरपर्यंत उड्डाण

## ठळक वैशिष्ट्ये

- या उत्पादन लाइनमुळे २०३२-३३ पर्यंत हवाई दलाला १८० तेजस विमाने मिळण्यास मदत होईल. सध्या येथे वर्षाला आठ लढाऊ विमाने तयार केली जात आहेत, जी १० पर्यंत वाढवता येतील.
- प्रत्येक तेजस मार्क १ ए ची सरासरी किंमत ६०० कोटी आहे.
- या लढाऊ विमानाच्या पंखांमध्ये नऊ क्षेपणास्त्रे बसवण्याची सोय आहे.
- हवाई दलासाठी तेजस विमान तयार करणाऱ्या एचएएलला अमेरिकेकडून सप्टेंबरमध्ये चौथे इंजिन मिळाले आहे.
- अत्याधुनिक रडार यंत्रणेसह नवा अवतार.

## नवीन काय

- एलसीए मार्क १ए मध्ये बसवलेल्या एईएसए रडारचे वेधक्षेत्र जुन्या रडारपेक्षा अधिक असून ते जॅमिंगला जुमानत नाही.
- या नव्या विमानात हवेत इंधन भरण्याची क्षमता आहे. सुमारे ४० सुधारणांमुळे या विमानाची देखभाल सोपी होईल.
- अपग्रेडेड रडार वॉर्निंग रिसीव्हर यंत्रणेमुळे विमानाला धोके लवकर ओळखता येतील.
- यात डिजिटल मॅप जनरेटर, स्मार्ट मल्टी-फंक्शन डिस्प्ले आणि प्रगत रेडिओ अल्टिमीटर देखील आहे.

## पाकिस्तानवर नजर

ते पाकिस्तान सीमेजवळील राजस्थानमधील बिकानेर येथील नल एअरबेसवर तैनात करण्याची योजना आहे. संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, या जेटचे स्वतःचे संरक्षक कवच आणि नियंत्रण ॲक्च्युएटर असतील. ■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयएनएस विक्रांतवर साजरी केली दिवाळी



भारतीय नौदलासमवेत आयएनएस विक्रांतवर साजऱ्या केलेल्या दिवाळी क्षणांची झलक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाईक केली. मोदींनी, एका बाजूला विशाल महासागर आणि दुसऱ्या बाजूला भारतमातेच्या शूर सैनिकांची अफाट ताकद असल्याचे अधोरेखित करत हा दिवस, एक उल्लेखनीय दिवस, एक उल्लेखनीय क्षण आणि उल्लेखनीय दृश्य असल्याचे नमूद केले. एका बाजूला अनंत क्षितिज आणि अमर्याद आकाश आहे तर दुसऱ्या बाजूला अनंत शक्तीचे प्रतीक असलेली आयएनएस विक्रांतची प्रचंड ताकद असल्याचं त्यांनी नमूद केले. समुद्रावरील सूर्यप्रकाशाचे किरण दीपावलीच्या वेळी शूर सैनिकांनी प्रज्वलित केलेल्या दिव्यांशी मेळ राखत आहेत, जणू दिव्यांची दिव्य माळच तयार होते आहे, असे निरीक्षण पंतप्रधानांनी नोंदवले. भारतीय नौदलातील शूर जवानांसमवेत दिवाळी साजरी करणे हा त्यांना मिळालेला मान आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

**एक्स या समाजमाध्यमांवरून लिहिलेल्या संदेश साखळीमध्ये पंतप्रधान मोदी नमूद करतातः**

आपल्या शूर नौदल सैनिकांसमवेत आयएनएस विक्रांतवर दिवाळी साजरी करत आहे. आपल्या कुटुंबियांसमवेत दिवाळी साजरी करणे लोकांना आवडते आणि मलाही, त्यामुळेच प्रत्येक वर्षी मी आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना आणि सुरक्षा दलांना भेटतो. गोवा आणि कारवारजवळ पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या भारतीय नौदलाच्या जहाजावर आयएनएस विक्रांतवर आपल्या शूर नौदल कर्मचाऱ्यांसमवेत असल्याचा मला आनंद वाटतो आहे.


**आयएनएस विक्रांत येथील हवाई सामर्थ्य प्रात्यक्षिकातून आयएनएस विक्रांतवरील योगअभ्यास!**

भारताची प्रतिष्ठा असलेल्या आयएनएस विक्रांतवरील, शूर नौदल जवानांना योग सत्रात सामील होताना पाहून आनंद झाला. आपल्याला एकत्र ठेवणे आणि आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य बळकट करण्याचे काम योग करत राहो. आपणा सर्वांप्रमाणे मलाही कुटुंबियांसमवेत दिवाळी साजरी करायला आवडते. म्हणूनच, या मंगलप्रसंगी, देशाच्या संरक्षणासाठी कार्यरत सैनिक आणि सुरक्षा दलांच्या जवानांना मी भेटतो. यावेळी गोवा आणि कारवारजवळ पश्चिम समुद्र सीमेवर असलेल्या आपल्या प्रमुख आयएनएस विक्रांतवर हे सौभाग्य मला प्राप्त झाले. आपल्या शूर नौदल सैनिकांसमवेत मिळालेली ही संधी मला नवी उर्जा आणि नवा उत्साह प्रदान करते.

**आयएनएस विक्रांत भारताचा अभिमान आहे.**

ही भारताची सर्वात मोठी स्वदेशी तंत्रज्ञानाने तयार झालेली युद्धनौका आहे. कोची येथे झालेला समारंभ मला आठवतो, तेव्हा ही युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली होती. दिवाळीच्या मंगल प्रसंगी इथे येण्याचा सन्मान मला मिळाला. काल संध्याकाळी आयएनएस विक्रांतवर अविस्मरणीय सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. आपले नौसैनिक प्रतिभावान आणि शूर आहेत. तसेच सर्जनशीलही आहेत. त्यांनी लिहिलेले 'कसम सिंदूर की' हे गीत माझ्या कायम स्मरणात राहील.

आजच्या स्टीमपास्टमध्ये सहभागी झालेल्या युद्धनौकांमध्ये आयएनएस विक्रांत आयएनएस विक्रमादित्य



(मी दहा वर्षांपुर्वी संयुक्त कमांडर्स परिषदेसाठी आलो होतो), आयएनएस सुरत (या वर्षी सुरवातीला मुंबईत जे सेवेत दाखल झाली होती) आयएनएस मुरगांव , आयएनएस चेन्नई (फ्रान्समध्ये २०२३ मध्ये बॅस्टिल डे समारंभामध्ये सहभागी होती), आयएनएस इंफाळ (जी यावर्षीच्या मॉरीशस राष्ट्रीय दिन समारंभात सहभागी झाली होती) आयएनएस कोलकाता, आयएनएस तुशील, आयएनएस तबर, आयएनएस तेग, आयएनएस बेतवा, आयएनएस दीपक आणि आयएनएस आदित्य यांचा समावेश होता.

आयएनएस विक्रांत येथील फ्लायपास्टमध्ये ध्वज आणि नौदलाच्या बोधचिन्हासह चेतक, एमएच ६० आर, सीकिंग, कामोव ३१, डोर्नियर, पी८आय आणि मिग २९ के यांचा समावेश होता. ■

# सैन्यदलाचे मनोबल वाढविणारे पंतप्रधान



● प्रसन्न आठवले

> पंतप्रधान मोदी आयएनएस विक्रांत या विमानवाहू नौकेवर जाऊन आपला दिवाळीचा आनंद साजरा करून आले. मला आजही १३ मे आठवतो. ऑपरेशन सिंदूरनंतर तिसऱ्या दिवशी मोदी आदमपुर, पंजाब हवाई तळावर गेले होते. एस ४०० च्या कामिगिरीच्या पार्श्वभूमीवर भाषण करताना ऑपरेशन सिंदूरनंतर तिसऱ्या दिवशी जगाने हे पाहिलं.

**पाक** सीमेपासून १०० किमी च्या आत असलेल्या या भारतीय वायुदलाच्या हवाई तळावर मोदीजी, ९/१० मेच्या धक्कादायक हवाई हल्ल्यानंतर आणि शत्रूच्या वायुदलाचे ११ हवाई तळ उध्वस्त केल्यानंतर ३ त्या दिवशी जाऊन, आपल्या सैन्याचं मनोबल वाढवून, तिथे भाषण देऊन, त्यांचं कौतुक करून आणि उत्साह वाढवून आले. याला प्रचंड धैर्य लागतं. त्यांना दाखवून द्यायचं होतं की, माझी हवाई सुरक्षा प्रणाली आणि व्यवस्था त्याचप्रमाणे हवाई दल, पूर्ण मजबूत आणि सक्षम आहे.

काल पुन्हा ते नौसेनेच्या आयएनएस विक्रांत या विमानवाहू नौकेवर जाऊन, पूर्ण एक दिवस घालवून आले. यातून जगाला, चीनला, अमेरिकेला, तुर्कीला, दाखवून द्यायचं आहे की माझं नौदल सक्षम आहे. त्यावेळच्या ३९ मिनिटांच्या भाषणात त्यांनी अनेक मुद्दे मांडले. पण त्यातील काही, महत्वाचे होते. त्यातील पहिला मुद्दा त्यांच्याच शब्दात आधी ऐकुया. मग विश्लेषण करूया. समोर बसलेल्या आणि संरक्षण दलाच्या सर्व जवानांना उद्देशून ते म्हणाले की, 'आप वीर जवान इसी मिट्टी मे पैदा हुवे हो. जिस माँ की कोख से आपने जनम लिया है, वो भी इसी मिट्टी से पली बडी हुई है, और इसलिये इस मिट्टी के लिये मरने के लिये, इस मिट्टी के मान सन्मान के लिये, अपने आपको खपा देनेकी प्रेरणा आप रखते हो.'

या वाक्यांचं विश्लेषण करताना दोन मुद्दे लक्षात घ्या. म्हणजे संदर्भ कुठे जातो, ते कळेल. एक म्हणजे तुम्ही या देशात जन्माला आलात, वाढलात आणि दुसरा मुद्दा खूप महत्वाचा आहे. ज्या आईच्या पोटातून किंवा गर्भातून तुमचा जन्म झाला, ती आईसुद्धा या मातीतच जन्माला आली आणि म्हणून तुमच्या मनात, रक्तात असलेलं





मातृभूमीचं प्रेम, देशभक्तीचा हा जोश अत्यंत नैसर्गिक आहे, तार्किक आहे, योग्य आहे. इथे आर्य चाणक्याच्या एका वचनाची आठवण मोदीजी अप्रत्यक्षपणे करून देतात. चंद्रगुप्ताच्या एका विदेशी पत्नीच्या पुत्राला चाणक्याने सत्तेपासून बेदखल करताना हेच कारण दिलं की विदेशी मातेला या देशाबद्दल प्रेम आस्था असू शकणार नाही. त्यामुळे ती तिच्या पुत्राला ते भाव देऊच शकत नाही. म्हणजे देशप्रेम व देशभक्ती ही त्याच पुत्रांना असू शकेल जे इथल्या मातीतल्या मातेच्या पोटी जन्माला आलेत. आज नेमकी तीच गोष्ट मोदींनी जवानांच्या संदर्भात पण अप्रत्यक्षपणे दुसऱ्याला उद्देशून सांगितली आहे.

आता याचा अर्थ सरळसरळ मोदींनी काही उल्लेख न करता, तरीही स्पष्टपणे सांगितलं आहे की, ज्याची आई या देशात जन्माला आलेली नाही, त्या बाईच्या मुलाला देशभक्ती असण्याचा संबंधच येत नाही. म्हणजेच अशा मुलाकडून, आपण देशभक्तीची, देशप्रेमाची आणि देशाच्या भल्यासाठी काही करण्याची अपेक्षा करणं हेच मुळात चूक आहे. म्हणजेच आता लोकांनी ठरवायचं आहे. देशभक्ती आणि देशप्रेम कोणताही माणूस आपल्या आईच्या कुशीतून जन्माला येताना घेऊन येतो. थोडक्यात ज्याची आई या देशात जन्माला आली, तिच्याच लेकरांना देशभक्ती आणि देशप्रेम समजू शकतं. अर्थातच जर आईला, देशाबद्दल काही प्रेम, आत्मियता नसेल, तर मुलाच्यात कुठून येणार, इतका सरळ अर्थ यातून निघतो. हा स्पष्ट संदेश, देशवासीयांसाठी मोदींनी दिला आहे, असं माझं स्पष्ट मत आहे. पुढे आपल्या संरक्षण सिद्धते विषयी बोलताना त्यांनी एक महत्वाची माहिती दिली. त्याचाही विचार करणं आवश्यक आहे. त्यांनी सांगितलं की गेल्या ९ वर्षात ४० पेक्षा जास्त स्वदेशी युद्धनौका/पाणबुड्या भारतीय शिपयार्डमधून नौसेनेत दाखल झाल्या आहेत. ही अत्यंत अभिमानाची आणि खूप महत्त्वाची गोष्ट आहे.

त्यापुढे त्यांनी हे देखील सांगितलं की, आता सरासरी, ४० दिवसात एक युद्धनौका किंवा पाणबुडी नौदलात दाखल होण्यासाठी सज्ज होत आहेत. म्हणजेच जे प्रोजेक्ट सध्या सुरू आहेत, त्यातून ज्या नवीन युद्धनौका किंवा पाणबुड्या दाखल होतील,त्यांचा दाखल होण्याचा सरासरी काळ प्रत्येक ४० दिवसात एक, असा असेल. हा नौदलाच्या वाढत्या ताकदीचा अंदाज मोदींनी दिला.

तिसरा सुद्धा खूप महत्वाचा मुद्दा त्यांनी मांडला तो म्हणजे समोर बसलेल्या सैन्याला ते म्हणाले की, तुम्ही प्रवाहात वाहणारे नाही. हे सांगताना त्यांनी एक मुद्दा मांडला की, गंगा कहे गंगादास और जमना कहे जमनादास, हे तुमच्या रक्तात नाही. म्हणजेच भेदाचे मुद्दे, हे सैन्यात नाहीत. थोडक्यात गंगा जमना तहजीब सैन्यात नाही. म्हणजेच देशातील इतर भेदाचे प्रवाह तुमच्यात तुम्ही येऊ देणार नाही. मला वाटतं की आयएनएस विक्रांत या विमानवाहू नौकेवर जाऊन, मोदींनी जगाला आपल्या सैन्यातील एका दलाची ताकद दाखवली. विशेष करून, चीन, पाक, तुर्की, अमेरिका या देशांना धाक बसण्यासाठी, जोषपूर्ण भाषणाने मोदींनी यावेळची दिवाळी दणक्यात साजरी केली. आपणही आपल्या सैन्याच्या साहसाला, बलिदानाला आणि त्यागाला सॅल्युट करूया. ■

# ... म्हणून पंतप्रधान मोदींचा अभिमान वाटतो



● चेतन दीक्षित

| | |
|---|---|
| २०१४: सियाचीन | २०२०: जैसलमेर |
| २०१५: अमृतसर | २०२१: नॉशेरा |
| २०१६: लाहौल | २०२२: कारगिल |
| २०१७: गुरेज | २०२३: लेप्चा |
| २०१८: चामोली | २०२४: कच्छ |
| २०१९: राजौरी | २०२५: आयएनएस विक्रांत |

मोदी निर्विवादपणे का आवडतात? ह्याचं एक असं उत्तर की जे विरोधकांनासुद्धा निरुत्तर करेल, अर्थात थोडीफार अक्कल शाबूत असलेल्यालाच बरं. एक असा पंतप्रधान दाखवा ज्याने एक प्रथा सुरू केली आली आणि जेवढा काळ सत्तेत आहे त्या काळात अखंडपणे ती पाळली. असा एक पंतप्रधान आहे, त्याचं नाव नरेंद्र दामोदरदास मोदी.

२०१४ पासून दरवर्षीची दिवाळी सैनिकांसोबत साजरी करायची प्रथा ह्या माणसाने सुरू केली आणि २०२५ हे त्याचे सलग बारावे वर्ष.

मोदींच्या काळात सैन्याला आधुनिकता मिळाली, सन्मानजनक वेतन मिळालं, अंगातली धमक शत्रूला आणि जगाला दाखवायची संधी मिळाली. ह्या अशा सैन्यासोबत मोदी दर वर्षी दिवाळी साजरी करतात. म्हणून भक्त कोणी म्हटलं तर राग नाही तर गर्व वाटतो. हा असा अजिंक्य नेता लाभणे पण भाग्याचेच. ह्या भाग्याची जाणीव पण तेवढीच महत्वाची कारण उठसुठ कोणालाही हे लाभत नाही. आयुष्यात ज्यांनी जिल्ह्याची वेस ओलांडली नाही असल्यांच्या समर्थकांना जगात ज्या व्यक्तीचा डंका वाजतोय त्या समोर गल्लीबोळ थोरच वाटणार. ■

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनसंपर्क कार्यालयातील अनुभव यात्रा

● अरुण कणेर

**दंत चिकीत्सा चाचणी :** गेल्या काही वर्षाच्या काळात जनतेमध्ये आपल्या बत्तीशीची काळजी घेण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असले तरी, त्यावर होणारा खर्च आजही गरीब जनतेच्या आवक्याबाहेर आहे. सामन्यत: एका दाताला रुट कॅनल करण्याकरिता ५ हजार रुपयाच्यावर खर्च येतो. दाताची तपासणी करणे आणि त्यावर उपचार करण्याच्या बऱ्याच सोई या ठिकाणी मोफत केल्या जातात. इतकेच नव्हेतर या कार्यालयामार्फत दातांना रूट कॅनल करणे आणि वयोवृध्द व्यक्तीला दाताची कवळी मोफत बसविण्याची सुविधा या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून येथे येणाऱ्या गरीब रुग्णांना मोफत पुरविली जाते.

**डोळ्याची तपासणी :** मोबाईल आणि टिव्हीच्या जमान्यात लहान मुलांना सुध्दा चष्मे लागत आहेत. हा आजार होण्यासाठी गरीब–श्रीमंत असा कोणताही भेदभाव निसर्गाने केला नाही. डोळ्याची तपासणी जरी स्वस्तात होत असली तरी, चष्म्याचा खर्च मात्र मोठा आहे. या ठिकाणी येणाऱ्या रुग्णांना डोळे तपासणी सहीत, गरीबांना मोफत चष्मे मिळवून दिले जातात. त्याचप्रमाणे मोतीबिंदूचे ऑपरेशनसहीत डोळ्याच्या इतरही आजारावरील उपचार मोफत करून देण्याकरिता मदत केली जाते.

**शाश्वत वैद्यकीय सेवा निसर्गोपचार कक्ष :** कोरोना काळापासून जनतेचा आयुर्वेद व निसर्गोपचाराकडे ओढा वाढला आहे. जनतेची ही मागणी विचारात घेवून देवेंद्रजींनी आपल्या जनसंपर्क कार्यालयात निसर्गोपचार कक्ष सुरु केला आहे. डॉ. माधुरी इंदूलकर आणि डॉ. मुकूल गुरु यांच्याकडे या कक्षाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**विशेष आरोग्य शिबीरे :** देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातील वैद्यकीय सेवा केवळ शारीरिक तपासणी पुरत्याच मर्यादित नाहीतर, या ठिकाणी दर महिन्यातून किमान एकदातरी दुर्मिळ आजाराकरिता विशेष शिबीरे आयोजित केले जाते. त्यामध्ये सिकलसेल शिबीर, कॅन्सर



तपासणी शिबीर, महिलांकरिता मॅमोग्राफी शिबीर आणि हृदयरोग व रक्तदाब तपासणी असे कितीतरी प्रकारची शिबीरे येथे नियमित आयोजित केली जातात.

आर्थिकदृष्ट्या कमजोर घटकांतील कुटुंबाकरिता केंद्र शासनाने 'आयुष्यमान भारत कार्ड' आणि राज्य शासनाने 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' सुरु केली आहे. या दोन्ही योजनेअंतर्गत जास्तीत जास्त एका वर्षाच्या काळात एका कुटुंबाला पाच लाख रुपये खर्चापर्यतचा उपचार करता येतो. कधी–कधी आजारावरील खर्चाची मर्यादा पाच लाखापेक्षाही अधिक होते तेव्हा अशा कुटुंबाकडे अनेक अडचणी निर्माण होतात. अशा अडचणीच्या वेळी या कार्यालयामार्फत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून त्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळवून दिली जाते.

देवेंद्रजीच्या या जनसंपर्क कार्यालयामार्फत केवळ रुग्णाच्या तपासणीचे कामकाज चालत नाही तर, जर रुग्णांची सखोल तपासणी करणे आवश्यक असेल तर, त्या रुग्णांना नागपूरातील विविध नामवंत हॉस्पीटलमध्ये पुढील उपचाराकरिता पाठविण्यात येते. याकरिता या कार्यालयामार्फत आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविल्या जातात. या ठिकाणी आलेल्या रुग्णांना केवळ वैद्यकीय



मदतच दिली जात नाहीतर, येथे आलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या कोणतीही वैद्यकीय समस्या आली तर, या कार्यालयातील सर्व यंत्रणा त्यांना मदत करण्यास तयार असते. दुर्मिळातील दुर्मिळ आजारांकरिता वैद्यकीय मदर मिळवून देण्याकरिता माननीय देवेंद्रजी केव्हाही तयार असतात. या ठिकाणच्या सेवेचा लाभ घेतलेल्या कित्येक लोकांनी आपले अनुभव लेखी स्वरुपात या जनसंपर्क कार्यालयाकडे पाठविले आहेत. त्यापैकी हटके असलेली दोन अनुभवाचा उल्लेख मला आवर्जून करावसा वाटतो.

**अनुभव- १**

ही घटना आहे फेब्रुवारी महिन्याच्या २०२१ ची. मुंबईच्या तीरा मिहीर कामत नावाच्या पाच महिन्याच्या मुलीला स्पाइनल मस्क्रुलर ॲट्रॉफी आजार झाला होता. ती सहा महिन्यापेक्षा जास्त जगू शकणार नाही. हे शब्द ऐकून आई-वडील स्तब्ध झाले. हे शब्द कानावर पडताच आणि चिमुकलीच्या कुटुंबाला धक्काच बसला. त्याच्या डोळयासमोर त्यांची छोटीशी परी हसत खेळत असतानाही, ती कायमची सोडून जाईल ही कल्पनाच त्यांना असह्य झाली. त्यांनी अनेक रात्री रडत काढल्या. ५ महिन्याच्या चिमुकल्या तीरावर तिच्या अंधेरीतील घरी पोर्टेबल व्हेंटिलेटरवर उपचार सुरु होते. अशातच त्यांना आशेचा एक किरण दिसला, तो म्हणजे अमेरिकेतून मागविण्यात येणारे १६ कोटी रुपयाचे इंजेक्शन तिच्या या आजारावर उपचार ठरणारे होते. ज्यामुळे तीरा पूर्णपणे बरी होणार होती. पण एवढी मोठी रक्कम एका सामान्य कुटुंबासाठी विचार करण्यापलीकडे होती. आपल्या लेकीला वाचविण्यासाठी तीराच्या आई-वडिलांनी क्राऊड फंडिंगचा मार्ग निवडला. यासाठी कामत कुटुंबियांना अनेक दानशूर व्यक्ती, सेवाभावी संस्थांनी मदत केली. यातून या इंजेक्शनसाठी आवश्यक असणारी रक्कमही उभी झाली, पण आता या कुटुंबियांसमोर एक वेगळीच अडचण उभी राहिली. अमेरिकेतून मागविण्यात येणारे हे इंजेक्शन भारतात आणण्यासाठी ६ कोटी रुपयाची कस्टम ड्यूटी अर्थात सीमा शुल्क लागणार होते. आधीच आर्थिक संकटांचा डोंगर डोक्यावर आणि त्यात कस्टम ड्यूटीच्या नव्याभाराने कुटुंब पूर्णपणे कोलमडून पडले होते.

समाजमाध्यमे आणि वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून जेव्हा ही बातमी देवाभाऊंना समजली. तेव्हा देवेंद्रजी विरोधी पक्षनेते होते. त्यांनी तीराच्या आजाराचे गांभीर्य लक्षात घेवून तातडीने, केंद्र सरकारशी संपर्क साधला. पंतप्रधान कार्यालय, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे कार्यालय आणि आरोग्यमंत्री यांच्या कार्यालयाशी तातडीने संपर्क साधून सीमाशुल्क माफ करण्याकरिता पत्रव्यवहार केला आणि अथक पाठपुरावा करुन कमी वेळात या इंजेक्शनावरील ६ कोटींचा कर माफ करुन दिला. देवाभाऊंच्या या धावपळीमुळे तीराच्या आई-वडिलांना फार मोठा दिलासा मिळाला आणि ते इंजेक्शन तीराला वेळेत मिळाले. देवाभाऊंमुळे प्रयत्नामुळे केवळ तीराचा जीवच वाचवला नाही, तर एका संपूर्ण कुटुंबाला नवजीवन दिले. देवभाऊचे हे कार्य देवदूतासारखे नाही का? दवेंद्रजीचे केवळ एकटेच हे उदाहरण नाही. यापूर्वीही देवेंद्रजींनी वेदांत नावाच्या एका चिमुकल्याच्या वेळीही ४० लाख रुपयाची मदत करून त्याचा जीव वाचवला होता.

**अनुभव-२**

हेमंत रामचंदानी नागपूर भागातील गरीब कुट्रंब आहे. हेमंत रामचंदानी यांच्या पत्नीला २०१५ मध्ये ब्रेस्ट कॅन्सर झाला. तेव्हापासून त्यांच्यावर कॅनगसरचे उपचार सुरु आहे. त्यांच्या उपचाराकरिता दरवर्षी किमान साडेपाच लाख रुपयांचा खर्च येतो. यामुळे हे कुटुंब आर्थिक विचनेतून उपचार करीत आहे. ही गोष्ट देवेंद्रजींच्या या जनसंपर्क कार्यालयात काम करणारे विकास खेडेकर (वय ७२) व चित्रा घाटेकर (वय ६९) यांना कळली. त्यांनी या कार्यालयाच्या माध्यमातून धावपळ करुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळवून दिली आणि इतरही दात्यांच्या माध्यमातून त्यांना आर्थिक मदत करीत आहेत. ■

# केंद्राची महाराष्ट्रासह चार राज्यांमध्ये डाळी, तेलबिया खरेदी योजनेला मान्यता



**केंद्र** सरकारने महाराष्ट्रासह चार राज्यांतील शेतकऱ्यांकडून १५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या डाळी आणि तेलबिया खरेदी करण्याच्या योजनेला मंजुरी दिली. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठी तेलंगणा, ओडिशा, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील डाळी आणि तेलबियांच्या खरेदी योजनेला मान्यता दिली आहे. या राज्यांसाठी एकूण मंजूर खरेदी रक्कम १५,०९५.८३ कोटी रुपये एवढी असून त्याचा संबंधित राज्यांमधील लाखो शेतकऱ्यांना फायदा होईल, असे निवेदनामध्ये म्हटले आहे. चौहान यांनी या राज्यांच्या कृषी मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या उच्चस्तरीय व्हर्चुअल बैठकीत प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान (पीएम-आशा) आणि मंत्रालयाच्या इतर योजनांअंतर्गत या मंजुरी दिल्या. सविस्तर चर्चेनंतर, चौहान यांनी किंमत समर्थन योजनेअंतर्गत ३८.४४ कोटी रुपयांच्या किमतीत ४,४३० टन मूग खरेदी करण्यास मान्यता दिली, जे तेलंगणाच्या एकूण उत्पादनाच्या २५ टक्के आहे. निवेदनानुसार, उडदाची १०० टक्के खरेदी केली जाईल, तर सोयाबीनची २५ टक्के खरेदी देखील मंजूर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, ओडिशामध्ये पीएसएस अंतर्गत १८,४७० टन अरहरला मंजुरी देण्यात आली आहे, ज्यासाठी १४७.७६ कोटी रुपयांचे बजेट वाटप करण्यात आले आहे. महाराष्ट्रात चौहान यांनी पीएसएस अंतर्गत ३३,००० टन मूग, ३,२५,६८० टन उडीद आणि १८,५०,७०० टन सोयाबीन खरेदीला मान्यता दिली, ज्याची एकूण किंमत अनुक्रमे २८९.३४ कोटी रुपये, २,५४०.३० कोटी रुपये आणि ९,८६०.५३ कोटी रुपये आहे. मध्य प्रदेशात किंमत कमतरता देयक योजनेअंतर्गत (पीडीपीएस) २२,२१,६३२ टन सोयाबीन खरेदीला मंजुरी देण्यात आली आहे, ज्याचा आर्थिक बोजा १,७७५.५३ कोटी रुपयांचा आहे. ■

# स्मार्टफोन निर्यातीने केला १.८ अब्ज डॉलर्सचा नवा विक्रम

**सप्टेंबरमध्ये** स्मार्टफोन निर्यातीने १.८ अब्ज डॉलर्सचा नवा विक्रम गाठला आहे. भारतात इलेक्ट्रॉनिक्स घटक उत्पादनाच्या वाढीमुळे इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढतील, असे केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्टमध्ये माहिती देताना म्हटले आहे.

भारतातून निर्यात होणाऱ्या सर्व वस्तूंमध्ये इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आता तिसऱ्या क्रमांकावर आहेत. भारतात इलेक्ट्रॉनिक्स घटकांच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील वाढीमुळे हजारो नवीन रोजगार निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, आता मल्टी-लेयर प्रिंटेड सर्किट बोर्ड (पीसीबी), एचडीआय पीसीबी, कॅमेरा मॉड्यूल, कॉपर क्लॅड लॅमिनेट आणि पॉलीप्रॉपिलीन फिल्म्स फक्त भारतातच तयार केल्या जातील. इलेक्ट्रॉनिक्स कम्पोनंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीमला देशांतर्गत आणि जागतिक कंपन्यांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला आहे. सात प्रकल्पांना दिलेल्या मंजुरीच्या माध्यमातून ३६,५५९ कोटी रुपयांचे घटक तयार होतील आणि ५,१०० हून अधिक थेट रोजगार निर्माण होतील. भारताची स्मार्टफोन निर्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ९५ टक्क्यांनी वाढून १.८ अब्ज डॉलर्सवर गेल्याचे इंडिया सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशनच्या अलीकडील अहवालात असे म्हटले आहे. निर्यातीतील या सततच्या वाढीमुळे भारताच्या मोबाईल फोन उत्पादन परिसंस्थेचा पाया मजबूत होत आहे, असे असोसिएशनचे आयसीईएचे अध्यक्ष पंकज मोहिंद्रू यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री वैष्णव यांनी इलेक्ट्रॉनिक्स कम्पोनंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीम अंतर्गत ५,५३२ कोटी रुपये किमतीच्या सात प्रकल्पांच्या पहिल्या टप्प्याला मंजुरी देण्याची घोषणा केली. या योजनेतून ३६,५५९ कोटी रुपये किमतीचे सुटे भाग तयार होतील आणि ५,१०० हून अधिक थेट रोजगार निर्माण होतील. ■

# 'मेरीटाईम वीक-२०२५'मध्ये ५५ हजार ९६९ कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार

**सागरी** व्यापार आणि उद्योगाशी संबंधित करण्यात आलेल्या सामंजस्य करारांच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्र देशाच्या सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्राचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नेस्को, गोरेगाव येथे आयोजित इंडिया मेरीटाईम वीक २०२५ मध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत १५ विविध सामंजस्य करार करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप आणि सामंजस्य करार करण्यात आलेल्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अनेक कंपन्यांसोबत सागरी इकोसिस्टिम विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, सुमारे ५६ हजार कोटी रुपयांचे हे करार आहेत. यामुळे महाराष्ट्राला सागरी व्यापार आणि विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर नेण्यात मदत होईल. बंदर, वाहतूक, उद्योग आणि व्यवसाय या क्षेत्रातील सुविधा जागतिक दर्जाच्या बनतील.

मुंबईसाठी जल वाहतूक महत्त्वाची आहे. रो-रो सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आता गेटवे ऑफ इंडिया ते नवी मुंबई विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा सुरू केली जाणार आहे, ज्यामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचेल. तसेच, इलेक्ट्रिक व्हेसल (EV Vessel) ताफा आणला जात आहे, ज्यामुळे जलवाहतूक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनेल.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, महाराष्ट्रासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे सागरी क्षेत्रात प्रचंड विकासाच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जहाज बांधणी धोरण, प्रवासी जलवाहतूक आणि सागरी पर्यटन या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रगण्य ठरत आहे. लवकरच महाराष्ट्र हा देशाच्या सागरी विकासाचा केंद्रबिंदू बनेल. या करारांमुळे महाराष्ट्रातील सागरी क्षेत्राला जागतिक स्तरावर नवे बळ मिळेल. बंदरविकास, जहाज बांधणी, जहाजदुरुस्ती, आणि सागरी वाहतूक क्षेत्रात गुंतवणुकीचा नवा अध्याय सुरू झाला असल्याचेही मंत्री श्री.राणे म्हणाले.



### सामंजस्य करार आणि गुंतवणूक तपशील

■ अदानी पोर्टस अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लि. – दिघी बंदर व संलग्न पायाभूत सुविधांचा मेगा बंदर म्हणून विकास; अपेक्षित गुंतवणूक ४२,५०० कोटी.

■ जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लि. – जयगड आणि धरमतर या विद्यमान बंदरांचा विस्तार; गुंतवणूक ३,७०९ कोटी.

■ चौगुले अँड कंपनी प्रा.लि.–जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती, रिग दुरुस्ती, ऑफशोअर आणि ऊर्जा प्रकल्प विकास; गुंतवणूक ५,००० कोटी.

■ सिनर्जी शिपबिल्डर्स एन डॉक वर्क्स लि.– जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापरासाठी शिपयार्ड प्रकल्प; गुंतवणूक १,००० कोटी.

■ गोवा शिपयार्ड लि. – जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापरासाठी शिपयार्ड प्रकल्प; गुंतवणूक २,००० कोटी.

■ भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आयआयटी) मुंबई – सेंटर फॉर एक्सलन्स स्थापन करून जहाज डिझाईन व बांधणीसाठी संशोधन व विकास सुविधा निर्माण करणे.

■ आयआयटी मुंबई – सागरी अभियंत्रिकी व पायाभूत सुविधांमध्ये प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे. ■

# १८ लाख ५० हजार मेट्रिक टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट



**खरीप** हंगामातील सोयाबीन, उडीद आणि मूग खरेदीसाठी राज्यात मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली आहे. ३० ऑक्टोबरपासून नोंदणीला सुरुवात होणार असून १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी सुरू होईल. राज्यातील शेतकऱ्यांना उत्पादनाचा योग्य मोबदला मिळावा यासाठी केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट १८ लाख ५० हजार मेट्रिक टन, मूग ३ लाख ३० हजार मेट्रिक टन आणि उडीद ३२ लाख ५६ हजार क्विंटल इतके निश्चित केले आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. तसेच पणन महामंडळ बारदाना खरेदीची प्रक्रिया राबवणार असून यंदा त्याचा तुटवडा भासणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मागील वर्षी राज्यात ११ लाख २१ हजार मेट्रिक टन सोयाबीन खरेदी झाली होती. यंदा राज्यात ७५ लाख मेट्रिक टन उत्पादनाचा अंदाज असून, केंद्राकडे २० लाख मेट्रिक टन खरेदीचा प्रस्ताव देण्यात आला होता. पहिल्या टप्प्यात १८.५ लाख मेट्रिक टन खरेदीस मंजुरी मिळाली असून, गरज भासल्यास खरेदी वाढवली जाईल, असे रावल यांनी सांगितले. खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, विदर्भ सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ या संस्थांची नोडल संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ५६५ खरेदी केंद्रांची संख्या वाढवून यंदा दुप्पट केली जाणार आहे. तसेच बारदाणाअभावी खरेदीत गोंधळ होऊ नये यासाठी पणन महामंडळाने पुरेसा साठा तयार ठेवला आहे. खरेदी केंद्रांवरील गर्दी टाळण्यासाठी ॲप आणि पोर्टलवर नोंदणी तसेच तारीख, वेळ निश्चित करण्याची सोय केली आहे. जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपनिबंधक, कृषी अधिकारी आणि पोलीस प्रशासनाचा समावेश असलेल्या दक्षता पथकांची स्थापना करण्यात आल्याचेही रावल यांनी सांगितले. ■

# अतिवृष्टीग्रस्त मत्स्य उत्पादकांसाठी शासनाची मदत



**राज्यात** जून ते सप्टेंबरदरम्यान झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे केवळ शेतीचे नव्हे तर मत्स्यव्यवसायालाही मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी जलाशयातील मत्स्यसाठा, मत्स्यबीज, नौका आणि जाळ्या वाहून गेल्या असून मत्स्य उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने मत्स्य उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या मदतीसाठी कार्यप्रणाली निश्चित केली असून यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला. एनडीआरएफच्या निकषात न बसणाऱ्या मत्स्य उत्पादकांच्या नुकसानीच्या मदतीसाठी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने याबाबतचा जीआर जारी केला आहे. त्यानुसार, आता बोटीच्या अंशतः दुरुस्तीसाठी ६ हजार रुपये, तर पूर्णतः नष्ट झालेल्या बोटीसाठी १५ हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे. याशिवाय, अंशतः बाधित झालेल्या जाळ्यांसाठी ३ हजार रुपये, तर पूर्णतः नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी ४ हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे. तर मत्स्यबीज शेतीच्या नुकसान भरपाईसाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टरची मदत देण्यात येणार आहे. मत्स्य साठ्यासाठी ६० रुपये प्रतिकिलो तलावाच्या अपेक्षित मत्स्योत्पादनाच्या ५० टक्के मर्यादित मदत दिली जाणार आहे. बोटी आणि जाळी यासाठी मदत देताना खरेदीच्या जीएसटी पावत्या तपासल्या जाणार आहेत. प्रत्येक तलावाचे जलक्षेत्र, अपेक्षित मत्स्योत्पादन याचा विचार करून मत्स्यबीज वाहून गेल्याची आकडेवारी व मत्स्यसाठा वाहून गेल्याची आकडेवारी निश्चित करावी लागणार आहे. मत्स्य साठ्याबाबतची आकडेवारी निश्चित करताना मागील वर्षी तलावाच्या पाण्याची पातळीचा आढावा घेण्यात येणार आहे. ■

# हरित माणदेशाच्या दिशेने

**फलटण तालुक्यातील १ हजार ३५२ कोटी रु.च्या विकासकामांचे भूमीपूजन, लोकार्पण**



**दुष्काळमुक्तच** नाही तर, हरित माणदेशाच्या दिशेने मार्गक्रमण! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलटण, सातारा येथे 'कृतज्ञता मेळावा' येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण केले. या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमीत मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विकासकामांचा आढावा घेत, मुख्यमंत्री फडणवीस यांनी फलटण आणि माणदेश भागातील सर्वांगीण प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, निरा देवघर प्रकल्पाचे दोन्ही टप्पे फलटण आणि माळशिरस या दुष्काळी भागासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. पूर्वीच्या काळात विविध कारणांमुळे हे पाणी फलटण व माळशिरसपर्यंत पोहोचू शकले नव्हते, परंतु सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे स्वप्न साकार होत आहे. या प्रकल्पाद्वारे माणदेशातील दुष्काळ संपुष्टात येऊन हरित माणदेश उभारण्याचा संकल्प राज्य सरकारने केला आहे. जिहे-कठापूर, टेंभू तसेच सांगोला भागातील उपसा सिंचन प्रकल्पांद्वारेही या प्रदेशात नवे विकासाचे क्षितिज उघडले जात आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फलटण येथे प्रशासकीय आणि पोलीस विभागाच्या आधुनिक इमारतींचे भूमिपूजन करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नवे रस्ते, न्यायालयीन इमारती, औद्योगिक प्रकल्प, यंत्र सामुग्रीने सुसज्ज अशा रुग्णालयाची निर्मिती, तसेच पाण्याच्या उपलब्धतेसाठीच्या योजनांवर तातडीने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. माळशिरस तालुक्यातील २२ गावांपर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी टेंडर प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल, तसेच निरा देवघर उपसा सिंचन योजनेतील गावडेवाडी, शेखमीरवाडी आणि वाघोशी या योजनांनाही मंजुरी देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पाडेगाव - साखरवाडी - जिंती - फलटण - शिंगणापूर रस्ता करण्यात येईल. फलटण-शिंगणापूर रस्त्यावरील नाईकबंबवाडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये मेगा औद्योगिक प्रकल्प देण्यासह तालुका व परिसरातील विविध विकास कामे सुरू करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. फलटण येथे न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येईल तसेच फलटण येथील विमानतळाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात येऊन काम शक्य असल्यास करण्यात येईल. त्याचबरोबर फलटण येथील रुग्णालयातील सुविधा अद्ययावत करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमचे सरकार हे विकासाचा विचार करणारे सरकार आहे. राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास आणि शेतकऱ्यांचे हित हे आमचे प्राधान्य आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर संकट आल्यानंतर इतिहासातील सर्वात मोठे ३२,००० कोटींचे पॅकेज देण्यात आले आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचत नाही, तोपर्यंत आमचे प्रयत्न सुरू राहतील, असा निर्धार मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. ■

# शेत रस्त्यांबाबतच्या आदेशाची सात दिवसांत अंमलबजावणी सक्तीची

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती**

**शेत** रस्ते आणि वहिवाटीच्या रस्त्यांच्या वादात तहसीलदारांनी दिलेल्या आदेशाची सात दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणीची स्थळपाहणी पंचनामा आणि जिओ टंग छायाचित्रांच्या आधारे करणे अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार, पुणे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांचे जीवनमान सुकर करणे या विषयासाठी अभ्यास समिती नेमण्यात आली होती. या समितीने अनेक प्रकरणांमध्ये वहिवाटीचा रस्ता मोकळा करणे किंवा सरबांधावरून रस्ता देणे याबाबत सक्षम अधिकारी आदेश देतात. मात्र, त्या आदेशाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होऊन नागरिकाला रस्ता मिळाला की नाही, याची कोणतीही खात्री केली जात नव्हती. यावर अभ्यास केला. अनेक प्रकरणे तपासली. आदेश मिळूनही अर्जदाराच्या तक्रारीचे पूर्णतः निराकरण होत नव्हते, असे तथ्य शासनाच्या निदर्शनास आणून दिले. यामुळे आता महसूलमंत्री बावनकुळे यांनी शेतकरी हितासाठी सक्त निर्णय घेतला. याबाबतचे परिपत्रक काढून क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी सविस्तर दिशानिर्देश जारी केले आहेत.

ही खात्री केवळ तोंडी न करता त्यासाठी रीतसर स्थळपाहणी पंचनामा करणे व जागेची जिओ टॅग छायाचित्रे घेणे सक्तीचे करण्यात आले आहे. हा पंचनामा आणि जिओ टॅग फोटो संबंधित प्रकरणाच्या मूळ संचिकेमध्ये समाविष्ट करणे अनिवार्य असेल.

या निर्देशांमुळे केवळ 'कागदी' आदेश देऊन अधिकाऱ्यांची जबाबदारी संपणार नाही, तर निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी आपापल्या अखत्यारीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना द्याव्यात व अंमलबजावणीची वेळोवेळी खातरजमा करणे आवश्यक आहे. रस्त्याच्या वादात अडकलेल्या हजारो शेतकरी आणि नागरिकांना दिलासा मिळेल. ■

---

# वाळू घाटांचे लिलाव पंधरा दिवसांत!

**पूरस्थितीच्या** पार्श्वभूमीवर राज्यात मोठ्या प्रमाणावर वाळूची आवश्यकता भासणार असून, त्यामुळे वाळू घाटांचे लिलाव वेळेत करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना दिले. या कामात दिरंगाई करण्यावर कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.

वाळू धोरण आणि वाळू गटाबाबत महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला. अपर मुख्य सचिव विकास खारगे उपस्थित होते. तर, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज, सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

राज्यात कोणत्याही परिस्थितीत वाळू टंचाई निर्माण होऊ नये. वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया तातडीने पूर्ण करून सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा. वाळूचा अवैध उपसा व वाहतूक थांबवण्यासाठी कठोर कारवाई करावी. वाळू माफियांवर कारवाई होईलच पण, वाळू चोरी झाल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल. पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळालेल्या वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया तत्काळ पूर्ण करण्याचेही निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले. पर्यावरण परवानगी प्रक्रिया सुलभ होण्यासाठी महसूल आणि पर्यावरण विभागाने समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. राज्यातील वाळू साठ्यांची तपासणी करून माहिती अद्ययावत करण्याचेही निर्देशही यावेळी देण्यात आले. ■

# सावंतवाडी येथे 'मेक इन कोकण' वस्तूंचा महोत्सव




सावंतवाडी– उपस्थिती– विशाल परब, वेदिका परब, जिल्हा सरचिटणीस महेश सारंग, सावंतवाडी मंडल अध्यक्ष सुधीर आडीवरेकर, केतन आजगावकर, प्रसन्न देसाई, सुहास गवंडळकर, ॲड. संजु शिरोडकर, अजय गोंधावळे, मोहीनी मडगांवकर, विजय रेडकर आदी.



माजी आमदार अतुल शाह यांनी गिरगावातील महिलांकडून स्वदेशी कंदील खरेदी केले.




जव्हार– खा.डॉ.हेमंत सावरा, आ.हरिश्चंद्र भोये आदी.




वेंगुर्ले– आयुष्यमान वय वंदना योजनेचे फॉर्म वाटप– उपस्थिती– प्रदेश कार्यकारिणी सदस्य शरद चव्हाण, मंडल अध्यक्ष विष्णु परब, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. सुषमा खानोलकर, वसंत तांडेल, सुहास गवंडळकर, साईप्रसाद नाईक, प्रीतेश राऊळ, मनवेल फर्नांडिस, प्रणव वायंगणकर, लक्ष्मीकांत कर्पे, वृंदा गवंडळकर, वृंदा मोर्डेकर, शितल आंगचेकर, साक्षी पेडणेकर, कृपा मोंडकर, आकांक्षा परब, रसीका मठकर आदी.



गोरेगाव (मुंबई)– उपस्थिती– महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, माजी नगरसेविका प्रिती साटम आदी.



मुंबई– उपस्थिती– मुंबई अध्यक्ष अमित साटम, महिला मोर्चा उत्तर पश्चिम जिल्हा अध्यक्षा प्रीती साटम, ज्ञानमूर्ती शर्मा, दीपक कोतेकर आदी.



लातूर– उपस्थिती– आ.अभिमन्यू पवार, प्रा. अशोक तांबे, विधानसभा प्रमुख संतोष मुक्ता, ग्रामीण जिल्हा सरचिटणीस सुभाष जाधव, माजी नगराध्यक्ष किरण उटगे, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती प्रा. भीमाशंकर राचट्टे, मंडलाध्यक्ष प्रा.शिवरुद्र मुर्गे, माजी नगरसेवक समीर डेंग, मंडलाध्यक्ष रवी चिलमे, धनराज परसने, भटके विमुक्त आघाडी मंडलाध्यक्ष शिवाजी चव्हाण,रेवणसिद्ध भागुडे, शहर सरचिटणीस प्रणव नागराळे आदी.

पुणे– उपस्थिती– ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष गजानन वाकसे, पांडुरंग सुळ, सतीश सरगर, तुकाराम वाडकर, देवीदास बोराटे, राहुल ननवरे, सहदेव सरगर, दिपक रूपनवर, रणजीत पांढरे, रामभाऊ वाडकर आदी.





माणगाव (जि.रायगड)– उपस्थिती– निरज उभारे, निलेश थोरे, गजेंद्र धुमाळे, आनंद भंडारी, प्रणवसिंग ठाकूर आदी.



नांदेड– प्रदेश उपाध्यक्ष खा.डॉ. अजित गोपछडे, शिवराज बोधने आदी.



नागपूर- 'संजीवनी'योजनेंतर्गत ७५५ ई-रिक्षांचे दिव्यांगांना वाटप- उपस्थिती- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आ.डॉ.आशिष देशमुख, आ.डॉ.परिणय फुके आदी.



जळगाव- कार्यकर्त्यांशी संवाद- उपस्थिती- अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्धीकी, प्रदेश हज कमिटी संचालक सलीम बागवान, सुफी संवाद राष्ट्रीय प्रभारी डॉ. अस्लम खान, प्रदेश प्रभारी आबेद अली चौधरी, जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. शहेबाज शेख, जहांगिर खान, शब्बीरअली सय्यद, आसिफ शेख, रज्जाक खान, याकूब खान बांगी, अफसर शेख, जमील शेख, अनीस शेख आदी.



नंदुरबार- कार्यकर्त्यांशी संवाद- उपस्थिती- अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्धीकी, प्रदेश हज कमिटी संचालक सलीम बागवान, सुफी संवाद राष्ट्रीय प्रभारी डॉ. अस्लम खान, प्रदेश प्रभारी आबेद अली चौधरी, अल्पसंख्यक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष नोबेल नूरानी, नंदुरबार जिल्हा अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष लियाकत आदी.



माजी आमदार राजन पाटील, यशवंत माने, रणजितसिंह शिंदे यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



छत्रपती संभाजीनगरमधील निवृत्त शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, निवृत्त उपसंचालक भाऊसाहेब तुपे पाटील, जालन्याचे माजी शिक्षणाधिकारी रमेश पाटील, हिंगोलीचे माजी शिक्षणाधिकारी शिवाजी पाटील आदींचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आ. अनुराधा चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.




डॉ. विजयसिंह गायकवाड, कराडचे माजी नगरसेवक अरुण जाधव, नगरसेविका शारदा जाधव यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. अतुल भोसले, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, अशोक भोसले, आनंदराव पालकर, शिवाजीराव पवार, चंदाराणी लोणीया, अतुल शिंदे, विनायक विभुते, आशुतोष जाधव, अरुणा शिंदे, रमेश लोणीया.

# नूतन प्रदेश कार्यालयाचे भूमीपूजन














नूतन प्रदेश कार्यालयाचे भूमीपूजन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, रावसाहेब पाटील-दानवे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, राजेश पांडे, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, विधान परिषद गटनेते प्रविण दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com